७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. २५ जुलै २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २१० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# आदिवासी उत्पादनांच्या विपणनावर भर द्या : राज्यपाल

**मुंबई (दै. संध्या)**

- योजनांच्या परिणामाचे मूल्यांकन करा
- आदिवासी गावांचा सर्वांगीण विकास करून स्वावलंबी आदर्श गावांची निर्मिती करा



आदिवासी भागात तयार होणारी उत्पादने दर्जेदार असून त्यांचे प्रभावी आणि शाश्वत विपणन करणे ही काळाची गरज आहे. आदिवासी क्षेत्रात शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करून प्रत्येक आदिवासी गावाचे स्वावलंबी आणि आदर्श गावात रूपांतर करण्यासाठी क्लस्टर विकास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

लोकभवन येथे अनुसूचित क्षेत्रातील समूहविकास या विषयावर दूरदृश्य प्रणालीद्वारे आदिवासी विकास विभागासमवेत बैठक झाली. या बैठकीस राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे,आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त निलेश सागर, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त तसेच प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले, आदिवासी भागात बांबू, वेत, आयुर्वेदिक उत्पादने, लघु वनउत्पादने यांसह अनेक दर्जेदार उत्पादने तयार होतात. मात्र, त्यांच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे विपणन. प्रत्येक गावाची उत्पादन क्षमता, उपलब्ध बाजारपेठ आणि उत्पादकांना मिळणारे उत्पन्न यांचा अभ्यास करून दीर्घकालीन विपणन धोरण तयार करणे आवश्यक आहे. उत्पादनाचे पॅकेजिंग तसेच उत्पादनांसाठी कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात मुंबईसारखी मोठी बाजारपेठ असल्याने आदिवासी उत्पादनांच्या विक्रीसाठी विपणन धोरण राबविण्याची तसेच आवश्यक असल्यास कॉर्पोरेट संस्थांशी भागीदारी करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

संशोधन आणि विकास यावर भर देत बाजारपेठेच्या गरजेनुसार नवीन उत्पादने विकसित करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. तसेच आदिवासी कुटुंबांना पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन आदी विविध उपजीविका उपक्रम राबविण्यास प्रोत्साहन द्यावे. कोणताही प्रकल्प सुरू करण्यापूर्वी संबंधित कुटुंबाचे उत्पन्न किती आहे आणि योजना राबवल्यानंतर त्यात किती वाढ झाली, याचे मूल्यांकन झाले पाहिजे. यशाचे मोजमाप राबविलेल्या योजनांच्या संख्येवर नव्हे, तर त्या योजनांमुळे लोकांच्या जीवनात झालेल्या सकारात्मक बदलांवर झाले पाहिजे, असे राज्यपालांनी स्पष्ट केले. केवळ योजना राबविण्यावर भर न देता त्या योजनांमुळे आदिवासी कुटुंबांच्या उत्पन्नात आणि जीवनमानात किती सुधारणा झाली, याचे मूल्यमापन करावे. योजनांमुळे उपजीविका, आरोग्य, माता व बालआरोग्य आणि कुटुंबांच्या आर्थिक स्थितीत किती सुधारणा झाली, याचा नियमित आढावा घेऊन त्याचा अहवाल सादर करावा, अशी अपेक्षाही राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी व्यक्त केली. आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे म्हणाले, आदिवासी विकास विभागाने विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून कृती आराखडा तयार केला असून त्यासाठी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय आणि कृषी विभागांसह संबंधित विभागांच्या सचिवांशी चर्चा करण्यात आली असून केवळ नियोजन न करता आवश्यक त्या ठिकाणी अर्थसंकल्पीय तरतूदही करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

आयुक्त लीना बनसोड यांनी आदर्श आदिवासी गाव क्लस्टर योजनेअंतर्गत निवडलेल्या क्लस्टर्स, राबविण्यात येणारे उपक्रम आणि आगामी नियोजनाची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

# एखाद्याने आंबा चोरला तर त्याची शिक्षा फाशी नसते : चंद्रकांत पाटील

## २० विद्यार्थ्यांचा मृत्यू आंबा चोरल्यासारखं वाटतोय? : मनसे

**मुंबई (दै. संध्या)**



'नीट' (NEET) परीक्षेतील पेपरफुटी, त्यानंतर विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान आणि देशभरात सुरू असलेल्या आंदोलनावरून राजकारण तापले आहे. यातच आता राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी (24 जुलै) एका पत्रकार परिषदेत बोलताना केलेल्या एका अजब वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. "एखाद्याने आंबा चोरला, म्हणून त्याची शिक्षा फाशी असू शकत नाही," असा युक्तिवाद त्यांनी पेपरफुटी प्रकरणावर बोलताना केला. या वक्तव्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने त्यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली आहे. पत्रकार परिषदेत 'नीट' आंदोलनावर बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले की, विरोधक केवळ अधिवेशनाचे कामकाज रोखण्यासाठी या प्रश्नाचे राजकारण करत आहेत. "तुमचा हेतू जर हा असेल की या देशात पेपर्स फुटू नयेत, तर ते फुटूच नयेत. पण एखादा पेपर फुटल्यानंतर... म्हणजे एखाद्याने एक आंबा चोरला म्हणून त्याची शिक्षा फाशी नसते ना! आंबा चोरला तर त्याला समज देणे असते. आणखी काहीतरी चोरले तर त्याची शिक्षा वेगळी ठरलेली असते. प्रत्येक गोष्टीला 'फाशी-फाशी' असे नसते." "नीटची परीक्षा फुटली, पण ती पुन्हा झाली. त्यात कणभरही गडबड झाली नाही, निकाल लागले आणि आता कॅप राऊंड सुरू होतील. तरीही या विषयावरून राजकारण केले जात आहे. उठसूठ राजकारण करून आपण देशाचे, समाजाचे आणि जगातील आपल्या प्रतिमेचे नुकसान करत आहोत. या आंदोलनाचा विषय वेगळा आणि त्यामागील विरोधकांचा हेतू वेगळाच आहे.

# आदित्य ठाकरेंचा मुंबईतील आंदोलनातून अभिजित दिपकेंना कॉल

**मुंबई (दै. संध्या)**



शिवाजी पार्क परिसरात आज नीट पेपरफुटीच्या मुद्यावरुन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी तरुणाई मोठ्या प्रमाणावर जमली होती. तरुणांनी तिरंगा हाती घेत राष्ट्रगीत गायन केलं. या प्रसंगी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत, शर्मिला ठाकरे, तुषार गांधी, अभिनेता अतुल कुलकर्णी सहभागी झाले होते. यावेळी आदित्य ठाकरे यांच्या फोनवरुन अभिजित दिपके यांनी मुंबईतील तरुणाईसोबत संवाद साधला. आदित्य ठाकरेंनी अभिजित दिपके यांच्यासोबत फोनवरुन संवाद साधला. कॉकरोच जनता पार्टी, सोनम वांगचुक आणि विद्यार्थ्यांना पहिल्या दिवसापासून समर्थन दिल्याबद्दल अभिजित दिपके त्याने उद्धव ठाकरे यांचे आभार मानले. आज सीजेपीच्या प्रवक्त्यांनी जे.पी. नड्डा यांची भेट घेत तीन मागण्या केल्याचं दिपके यानं सांगितलं. सीजेपी आणि विद्यार्थी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर ठाम असल्याचं अभिजित दिपके म्हणाले. आदित्य ठाकरे यांनी अभिजित दिपके यांच्यासोबत संवाद साधताना राजीनामा घेऊनच व्यवस्था बदलायची आहे. हा नवा भारत आहे, झुकणार नाही, असंही आदित्य ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी शिवाजी पार्क परिसरात जमलेल्या तरुणाईला मार्गदर्शन केलं. या चार दिवसात आपण याच जागेवर दुसऱ्यांदा भेटलो आहोत. परवा दिल्लीला जाऊन आलो, आता रविवारी आपण भेटणार आहोत. आपण सर्व भारतीय आहोत, हीच ओळख आहे, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं. आपली ओळख विसरुन आपल्याला भीती दाखवून राज्य करत होते आजपर्यंत त्यांनी हे दृश्य पाहणं गरजेचं आहे. ही जन की बात दिल्लीला ऐकावी लागेल. दिल्लीमध्ये बेछूटपणे विद्यार्थ्यांवर लाठीहल्ला झाला. सरकारच्या हातात बंदुका, लाठी असेल पण आमच्या हातात तिरंगा आहे. आम्ही तिरंगा घेऊन तुमच्यासमोर आहोत, बघू तिरंगा जिंकतो की तुमची हुकूमशाही जिंकते, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

# नीट परीक्षेच्या दुसऱ्या निकालात मुलीला अवघे २०० गुण

## *वडिलांना हृदयविकाराचा झटका; लेकीचा सरकारला सवाल*

**अहिल्यानगर (दै. संध्या)**



देशात नीट पेपर फुटीवरुन चांगलाच संताप पाहायला मिळाला होता, त्यानंतर आता राजधानी दिल्लीत या नीट पेपरफुटीची धग दिसून आली. दिल्लीत सीजेपी म्हणजेच कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनास देशभरातून पाठिंबा मिळत असून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातही आज पालक, विद्यार्थी रस्त्यावर उतरुन आपला आक्रोश व्यक्त करत आहेत. अहिल्यानगर येथेही दुसऱ्यांदा नीट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थीनीने आपला संताप व्यक्त केला. तसेच, पुन्हा 2027 मध्ये नीटचा पेपर फुटणार नाही, याची गॅरंटी आम्हाला कोण देणार? असा सवाल देखील विद्यार्थीनीने विचारला. देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये NEET परीक्षेचा पेपर फुटल्यावरुन तीव्र संतापाचे वातावरण आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ दिल्लीसह विविध ठिकाणी आंदोलनही करण्यात येत आहे. सरकारने पेपरफुटी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले असले, तरी विद्यार्थी आणि पालकांमधील नाराजी अद्याप कायम आहे. अहिल्यानगरमधील हर्षाली यादवने दोन वेळा नीट परीक्षा दिली, तिच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. तिचे वडील मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. अनेक अडचणींवर मात करत त्यांनी हर्षालीच्या कोचिंगचा खर्च उचलला. मात्र, पेपरफुटीमुळे तिला पुन्हा परीक्षा द्यावी लागली. दुसऱ्या प्रयत्नात अपेक्षित गुण मिळाले नाहीत. या धक्क्यामुळे तिच्या वडिलांना हृदयविकाराचा झटका आला. आता पुन्हा परीक्षेची तयारी करायची आहे, मात्र कोचिंगसाठी आवश्यक पैसे नसल्याने तिच्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

दुसरीकडे, अहिल्यानगरच्या निर्मिती साळवे हिने पहिल्याच प्रयत्नात नीट परीक्षेत 500 हून अधिक गुण मिळवले होते. मात्र, पुन्हा परीक्षा द्यावी लागल्यानंतर तिला केवळ 200 गुण मिळाले. त्यामुळे ती निराश झाली आहे. भविष्यात पुन्हा परीक्षा दिल्यास पेपरफुटी होणार नाही, याची हमी कोण देणार, असा सवाल तिने उपस्थित केला आहे. निर्मितीची आई भारती साळवे यांनी सांगितले की, मुलीच्या शिक्षणासाठी आम्ही बँकेतून कर्ज घेतले. वारंवार परीक्षा द्यावी लागत असल्याने विद्यार्थी आणि पालक दोघांनाही मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे... अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सरकारने कठोर कायदा करणे आवश्यक आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांनी नीट परीक्षा प्रत्येक राज्यात स्वतंत्रपणे घेण्याची मागणी केली आहे... त्यामुळे पेपरफुटीच्या घटना कमी होतील आणि महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनाही त्याचा फायदा होईल, असे त्यांचे मत आहे.

देशभर पेटलेल्या CJP च्या आंदोलनाची धग छत्रपती संभाजीनगरपर्यंत पोहोचली आहे. दिल्लीतील विद्यार्थ्यांसोबत घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या देशव्यापी आंदोलनाला शहरातील वकील संघटनांनीही पाठिंबा दर्शवला आहे. क्रांती चौकात मोठ्या संख्येने वकील एकत्र येत सरकारच्या भूमिकेविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी सोनम वांगचुक आणि अभिजीत दीपके यांच्या समर्थनार्थही आवाज उठवण्यात आला. आंदोलनामुळे क्रांती चौक परिसर काही काळ घोषणाबाजी केली. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीत दिल्लीच्या जंतर-मंतर आंदोलनाचे पडसाद उमटले आहेत. जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित अमानुष लाठीहल्ल्याचा तीव्र निषेध करत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)ने आज दापोलीत आक्रमक मोर्चा काढला. विद्यार्थ्यांवर लाठीमार करणाऱ्या संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




## भाजप नेत्या चित्रा वाघ यांचा अनिल देशमुखांवर गंभीर आरोप, व्हिडिओवरून नवा वाद

# माजी गृहमंत्र्याकडूनच महिला पोलिसाचा विनयभंग!

**मुंबई (दै. संध्या)**



मुंबईत सध्या सुरू असलेल्या विविध आंदोलनांदरम्यान विनयभंगाच्या आरोपांवरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. एका बाजूला दादरमधील 'सीजेपी' आंदोलनादरम्यान साध्या वेशातील पोलिसाने विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे, तर दुसऱ्या बाजूला भाजपने थेट माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) नेते अनिल देशमुख यांच्यावरच एका महिला पोलिसाचा विनयभंग केल्याचा गंभीर आरोप केला आहे. या दोन्ही घटनांमुळे सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर जोरदार आरोप-प्रत्यारोप करत आहेत.

भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी एक व्हिडिओ शेअर करत माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर निशाणा साधला आहे. रस्त्यावर ठिय्या मांडणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना जेव्हा महिला पोलीस उठवत होत्या, तेव्हा अनिल देशमुख यांचा हात एका महिला पोलिसाला लागून विनयभंग झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

"स्वतःच्या राजकीय पोळ्या शेकण्यासाठी मुंबई पोलिसांवर खोटे आरोप करणाऱ्या संधीसाधू लांडग्यांनो, आता डोळे उघडा आणि नीट बघा..! ज्या मुंबई पोलिसांच्या नावाने कालपर्यंत थयथयाट करत होतात, त्याच मुंबई पोलीस दलातील एका महिला पोलिसाचा विनयभंग तुमच्याच महाविकास आघाडीचा माजी गृहमंत्री करत आहे. आता कुठे गेला तुमचा स्वाभिमान? ताकद असेल तर त्याला आघाडीतून तात्काळ हद्दपार करा!"

दरम्यान, या आरोपांवर अद्याप राष्ट्रवादीकडून अथवा अनिल देशमुखांकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही. या घटनेवरून येणाऱ्या काळात राजकीय वातावरण तापण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दुसरीकडे, कॉकरोच जनता पार्टीच्या (CJP) समर्थनार्थ 23 जुलै रोजी दादरमध्ये झालेल्या आंदोलनादरम्यान एक वेगळाच वाद उभा राहिला. साध्या वेशातील एका पोलीस कर्मचाऱ्याने एका विद्यार्थिनीला आक्षेपार्ह पद्धतीने पकडल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.

या व्हिडिओनंतर आमदार रोहित पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि वर्षा गायकवाड यांनी मुंबई पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त करत कारवाईची मागणी केली.

ज्या पोलीस कर्मचाऱ्यावर आरोप होत आहेत, त्यांचे नाव दीपक बल्लाळ असून ते शिवाजी पार्क येथे हवालदार म्हणून कार्यरत आहेत. या वाढत्या वादानंतर मुंबई पोलिसांच्या उपायुक्त कार्यालयाने स्पष्टीकरण देत विनयभंगाचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आंदोलन संपल्यानंतर निळ्या रेनकोटमधील एक तरुण मुलांना पुन्हा आंदोलनासाठी उकसावत होता. पोलीस हवालदार बल्लाळ त्याला ताब्यात घेण्यासाठी गेले असता, संबंधित तरुणी अटकाव करण्यासाठी मध्ये आली. अधिकारी एका पुरुष आंदोलकाला पकडून दुसऱ्या दिशेला पाहत असताना ही महिला नकळतपणे मध्ये आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्हिडिओचे बारकाईने परीक्षण करूनच ही वस्तुस्थिती मांडली आहे. "एक प्रथितयश व्यक्ती म्हणून, तुम्ही एखाद्या व्हिडिओच्या आधारे कोणताही अर्थ काढण्यापूर्वी तथ्यांची पडताळणी करणे अपेक्षित असते," असे मुंबई पोलिसांनी रोहित पवारांना सुनावले.

# काँग्रेसविरुद्ध भाजप रस्त्यावर

राहुल गांधींविरुद्ध घोषणाबाजी; कार्यकर्त्यांची पोलिसांसोबत बाचाबाची, बॅरिकेड्सही ढकलले

**बेळगाव (दै. संध्या)**



देशभरात नीट पेपरफुटीवरुन केंद्रीयमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याची मागणी करण्यात येत आहे. कॉकरोच जनता पार्टीने याबाबत आंदोलन सुरू केलं असून दिल्लीतील जंतर मंतरवर हे आंदोलन मोठं रुप घेत आहेत. देशभरातून आंदोलनास पाठिंबा वाढत असताना, राजकीय विरोधही या आंदोलनात सहभागी होताना दिसून येतात. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सत्ताधीशांविरुद्ध घोषणाबाजी केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदींबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी, काँग्रेसविरुद्ध भाजपही आक्रमक झाली आहे. बेळगावमध्ये भाजपने राहुल गांधींविरुद्ध घोषणाबाजी करत मोर्चा काढला होता. त्यावेळी, पोलिस आणि भाजप समर्थकांमध्ये चकमक उडाल्याचं दिसून आलं. नीट परीक्षेच्या पेपरफुटीच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या आंदोलनात देशाच्या पंतप्रधानांचा अवमान करणे, देशविरोधी घोषणाबाजी आणि भाजप आमदारावर अंडीफेक करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप भाजपच्यावतीने करण्यात आलाय. बेळगावात भारतीय जनता पक्षाच्यावतीने याविरोधात तीव्र निदर्शने करण्यात आली. दरम्यान, यावेळी पोलीस आणि आंदोलक यांच्यात शाब्दिक चकमक उडाल्याचे पाहायला मिळाले. काँग्रेस पक्षाच्या कृत्यविरोधात भाजप कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेत घोषणाबाजीने परिसर दणाणून सोडला होता. बेळगावच्या राणी चन्नम्मा चौकातून सुरू झालेला भाजपचा हा निषेध मोर्चा काँग्रेस भवनाला घेराव घालण्याच्या उद्देशाने पुढे सरकत होता. मात्र, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवत आंदोलकांना वाटेतच रोखले. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक झाली. कार्यकर्त्यांनी पोलिसांचे बॅरिकेड्स बाजूला ढकलून पुढे जाण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत मोर्चा रोखण्यात यश मिळवले. दरम्यान, या आंदोलनादरम्यान भाजप नेत्यांनी काँग्रेस सरकारवर सडकून टीका केली.

## दिल्लीत आपचा कँडल मार्च; पोलीस परवानगी नाही

दिल्लीतील CJP आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी आम आदमी पार्टीकडून दिल्ली विद्यापीठाच्या नॉर्थ कॅम्पसमधील आर्ट फॅकल्टी परिसरात कँडल लाईट मार्च काढण्याची शक्यता आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, या मार्चमध्ये सुमारे 150 जण सहभागी होण्याची अपेक्षा आहे. मात्र, या कार्यक्रमासाठी दिल्ली पोलिसांकडे कोणतीही अधिकृत परवानगी मागितलेली नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली असून, परिस्थितीवर पोलिसांचे बारकाईने लक्ष आहे.

# संपादकीय

## गुंड, पोलिस आणि राजकारणी

आपण काहीही करू शकतो, कायदे मोडण्यासाठीच आपण निवडून आलो, असे काही लोकप्रतिनिधींना सतत वाटत असते. त्या वाटण्याचा अहंगड वाढला की असे लोकप्रतिनिधी दिवसाढवळ्या शासकीय यंत्रणा असो की खासगी; दिसेल त्याला बडवण्याचे काम करत राहतात. कधीतरी अशा बेताल लोकप्रतिनिधींनाही फटकारण्याची गरज असते. ते काम मुंबई उच्च न्यायालयाने अतिशय उत्तमपणे पार पाडले आहे. कल्याण-डोंबिवलीचे शिंदेसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी डोंबिवली महापालिकेतील महिला डॉक्टरसह तीन डॉक्टरांना बेदम मारहाण केली. कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायदंडाधिकाऱ्यांनी त्यांना जामीन दिला. या प्रकरणानंतर राज्यभर डॉक्टरांमध्ये तीव्र संताप आणि नाराजी उमटली. त्यानंतर उच्च न्यायालयाने स्वतःहून (सुओ मोटू) या सगळ्या प्रकरणाची दखल घेत सुटीच्या दिवशी न्यायालय भरवले. रमेश म्हात्रेंच्या जामीन आदेशाला स्थगिती दिली. त्यांनी स्वतःहून पोलिसांना शरण यावे, असे आदेश दिले. हा निर्णय केवळ एवढ्या एका प्रकरणापुरता मर्यादित नाही. याकडे न्यायव्यवस्थेत उच्च न्यायालयाची भूमिका आणि कनिष्ठ न्यायालयांची जबाबदारी या दृष्टिकोनातून बघितले पाहिजे. न्यायालयाची भूमिका लक्षात घेतल्यानंतर तरी ठाण्याचे पोलिस जागे होतील अशी अपेक्षा होती. मात्र, सुनावणीसाठी म्हात्रे यांना व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्याची मागणी पोलिस अधिकाऱ्यांनी केली. त्यावर उच्च न्यायालयाने संतप्त होत, 'अशी मागणी करणारे पोलिस अधिकारी कोण आहेत? आरोपीला व्हीआयपी ट्रीटमेंट का देता? आम्हाला संबंधित पोलिसाचे नाव द्या. अन्यथा आम्ही ठाणे पोलिस आयुक्तांनाच न्यायालयात हजर राहायला सांगू' अशा भाषेत पोलिसांचे कान धरले. पोलिसांची अशी कोणती मजबुरी आहे की त्यांना आरोपीला पाठीशी घालावे वाटते..? मुळात कल्याण कोर्टातच पोलिसांनी जामिनासाठी विरोध करायला हवा होता. मात्र, या संपूर्ण प्रकरणात पोलिसच आरोपीला जामीन मिळावा आणि अटक झाली तर तत्काळ हॉस्पिटलमध्ये दाखल करावे, यासाठी आग्रही दिसत होते. पोलिसांची ही केविलवाणी धडपड आरोपीच्या चेहऱ्यावरील हास्यातून दिसत होती. 'आरोपी ७३ वर्षांचा आहे, त्याची एक किडनी काम करत नाही', असा युक्तिवाद कोर्टात झाला, तेव्हा 'डॉक्टरांना मारहाण करताना आरोपी एकदम २५ वर्षांच्या तरुणासारखा जोर काढून मारत होता. विशेषतः महिला डॉक्टरना मारताना त्याचा जोर अधिक होता', अशा शब्दांत उच्च न्यायालयाने संबंधितांचे कान उपटले. गुंड, पोलिस आणि राजकारणी यांची भ्रष्ट युती सर्वसामान्यांच्या जीवावर कशी उठते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे डोंबिवलीचे डॉक्टर मारहाण प्रकरण आहे. ही अशी पहिली घटना नाही. गेल्या वर्षी पुण्यातील 'पोर्शे' अपघातात दोन तरुणांच्या मृत्यूनंतर अल्पवयीन आरोपीला काही तासांतच जामीन देण्यात आला होता.

१५ पानी निबंध लिहिण्याची अट घालण्यात आल्याने देशभरातून तीव्र टीका झाली. अखेर जुवेनाईल जस्टिस बोर्डानेच स्वतःचा जामीन आदेश मागे घेत आरोपीला निरीक्षणगृहात पाठवले. अशा घटना जनक्षोभ निर्माण करतात. म्हात्रे प्रकरणात उच्च न्यायालयाने स्वतःहून हस्तक्षेप केल्यामुळे अजूनही न्याय शिल्लक आहे, यावर सर्वसामान्य जनतेचा विश्वास बसला असेल. मात्र, यानिमित्ताने कनिष्ठ न्यायालयांच्या निर्णय क्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

कनिष्ठ न्यायालयांवर राजकीय किंवा अन्य कोणते दबाव असतात का, हा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. एखादी घटना घडली म्हणून कनिष्ठ न्यायालयांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे योग्य नाही. मात्र, अशा घटना वारंवार घडू लागल्या तर हे प्रश्न आणखी जटिल होत जातील. याची उत्तरे दरवेळी वरिष्ठ न्यायालयांनीच का द्यावी, असेही कोणाला वाटू शकते. देशभरातील न्यायालयांमध्ये लाखो प्रकरणे पेंडिंग आहेत. कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयावर प्रत्येक वेळी सर्वसामान्य नागरिकाला उच्च न्यायालयापर्यंत जाणे केवळ अशक्य असते. त्यामुळेच कनिष्ठ न्यायालयांची जबाबदारी जास्त मोठी होते.

## संस्कृत सुभाषित

बुभुक्षितैव्यकिरणं न भुज्यते । पिपासितैः काव्यरसो न पीयते । न च्छन्दसा केनचिदुद्धृत कुलं । हिरण्यमेवार्जय, निष्कला गुणाः ।

अर्थ : ज्याला कडकडून भूक लागलेली आहे, त्याला व्याकरणाच्या भोजनाचा उपयोग नसतो, जो तहानलेला आहे, त्याची तहान काव्यरसाने भागत नाही (भुकेला भोजनच लागते व तहानेला पाणीच लागते), तसेच वेदांचा अभ्यास करून कुळाचा उद्धार होत नाही तर संपत्तीशिवाय (सोन्याशिवाय) सारे गुण हे निष्फळ ठरतात.

## गुरु वचन

### नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.

''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''

दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असमे!

## उपदेशकथा

### समाधान

एकदा एक माणूस देवाला प्रसन्न करायचे म्हणून तपश्चर्या करण्यासाठी बसला. एक दिवस देव प्रसन्न होऊन त्याला म्हणाला, 'तुला काय पाहिजे ते माग ! त्या माणसाने एकेक गोष्टी मागावयास सुरवात केली. देवाने आपल्या जवळच असलेला कमंडलू थोडासा तिरका केला. त्याप्रमाणे ती ती गोष्ट त्यातून बाहेर पडली. त्याच्या ज्या काही सुखाच्या कल्पना होत्या त्याप्रमाणे त्या गोष्टी मागितल्या. त्या देवाने सर्व दिल्या. त्यानंतर देवाने तो कमंडलू जमिनीवर सरळ उभा करून ठेवला. तसा माणूस म्हणाला, 'या कमंडलूच्या तळाशी काय आहे. तीही गोष्ट मला दे.' देव म्हणाला, 'ती गोष्ट मात्र मी तुला देणार नाही.' माणूस म्हणाला, 'अशी कोणती गोष्ट तळाशी आहे की तू मला देणार नाहीस.' देव म्हणाला, 'त्या गोष्टीचे नाव आहे समाधान. मी तुला समाधान दिले की तू मला विसरशील म्हणून मी तुला समाधान देणार नाही.'

कथा उपदेश : आयुष्यात जरी सर्व काही मिळाले तरी समाधान मिळतेच असे नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:ज्येष्ठा (अहोरात्र) |
| २५जुलै २०२६ | योग:ब्रह्म २१:०८:०९ |
| शुक्रवार | करण:विष्टि ११:३४:३३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बव २४:४६:३९+ |
| आषाढ शके | सूर्य:कर्क |
| संवत्– १९४८ | चन्द्र:वृश्चिक |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणयन | मुस्लिम मास – सफर |
| मास– आषाढ | तारीख – १० |
| ऋतु– हेमंत | विशेष |
| शुक्ल पक्ष | देवशयनी आषढी एकादशी |
| तिथि:एकादशी | पंढरपूर यात्रा चातुर्मास्यारंभ |
| ११:३४:३३ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | | 6 | | | | 9 | |
| | | 9 | | 5 | 8 | | | 7 |
| 5 | | 7 | | 4 | | 8 | | |
| | | | 4 | 9 | | | 3 | 2 |
| 9 | | 4 | | | | 5 | | 6 |
| 6 | 7 | | | 8 | 2 | | | |
| | | 2 | | 6 | | 1 | | 3 |
| 4 | | | 9 | 7 | | 2 | | |
| | 3 | | | | 5 | | 7 | 4 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०२० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 7 | 3 | 2 | 1 | 9 | 6 | 8 | 5 |
| 8 | 9 | 2 | 5 | 6 | 4 | 7 | 3 | 1 |
| 5 | 1 | 6 | 3 | 8 | 7 | 4 | 9 | 2 |
| 3 | 6 | 7 | 8 | 5 | 2 | 1 | 4 | 9 |
| 1 | 5 | 8 | 4 | 9 | 6 | 2 | 7 | 3 |
| 2 | 4 | 9 | 1 | 7 | 3 | 8 | 5 | 6 |
| 7 | 3 | 5 | 6 | 2 | 8 | 9 | 1 | 4 |
| 9 | 2 | 1 | 7 | 4 | 5 | 3 | 6 | 8 |
| 6 | 8 | 4 | 9 | 3 | 1 | 5 | 2 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०३०६ – कॉन्स्टंटाईन पहिला रोमन सम्राटपदी.
- ०८६४ – इंग्लंडचा राजा टकल्या चार्ल्सने व्हाईकिंग लुटारूंपासुन संरक्षणासाठी तटबंदी उभारण्यास सुरूवात केली.
- १५४७ – हेन्री दुसरा फ्रांसच्या राजेपदी.
- १५९३ – फ्रांसचा राजा हेन्री चौथ्याने जाहीररीत्या कॅथोलिक धर्म स्वीकारला.
- १७९७ – स्पेनच्या तेनेरीफ द्वीपांवरील हल्ल्यात होरेशियो नेल्सनने ३०० सैनिक व स्वत–चा उजवा हात गमावला.

### राष्ट्रीय

- १७६९ – थोरले माधवराव पेशवे आणि जयपूरचे राजे पृथ्वीसिंह यांच्यात सलोख्याचा तह.
- १९८२ – ग्यानी झैलसिंग राष्ट्रपती बनले.
- १९८७ – वेंकटरमण राष्ट्रपती बनले.
- १९९२ – शंकर दयाळ शर्मा राष्ट्रपती बनले.

### जन्म

- ११०९ – अफोन्सो पहिला, पोर्तुगालचा राजा.
- १५६२ – केटो कियोमासा, जपानी सामुराई.
- १८४८ – आर्थर बॅलफोर, युनायटेड किंग्डमचा ३३वा पंतप्रधान.
- १९०८ – बिल बोव्स, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९२९ – सोमनाथ चटर्जी, भारतीय राजकारणी.

### निधन

- ३०६ – कॉन्स्टान्शियस क्लोरस, रोमन सम्राट.
- १४०९ – मार्टिन पहिला, सिसिलीचा राजा.
- १४९२ – पोप इनोसंट आठवा.
- १९३४ – एंगेलबर्ट डॉलफस, ऑस्ट्रियाचा चान्सेलर.
- १९७३ – लुई स्टीवन सेंट लोरें, कॅनडाचा १२वा पंतप्रधान.

## : SMS :

Mummy: Beta shaadi kab karega?
Main: Jab bank balance aur self respect dono ek sath aa jayenge.
Mummy: Toh matlab kabhi nahi

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २६ | २१.९ |
| अहमदनगर | २५.८ | २२.५ |
| अकोला | ३१.५ | २४ |
| अमरावती | ३० | २३.७ |
| बीड | ३३.७ | २४.३ |
| भंडारा | २७ | २४.१ |
| बुलढाणा | ३९ | २७.५ |
| चंद्रपूर | ३३.८ | २५ |
| चेन्नई | ४०.४ | ३०.४ |
| नवी दिल्ली | ३८.७ | ३१.८ |
| धुळे | ३१.९ | २५.२ |
| गोंदिया | २६.१ | २४.१ |
| जळगाव | ३२.३ | २४.२ |
| कोल्हापूर | २५.२ | २२.५ |
| लातूर | २६.८ | २३.१ |
| मुंबई | ३३.४ | ३०.७ |
| नागपूर | २७.२ | २३.९ |
| नांदेड | ३१.५ | २४.५ |
| नंदूरबार | २५.७ | २४.९ |
| नाशिक | २४.८ | २४ |
| पुणे | २३.७ | २२ |
| पंढरपूर | २८.५ | २३.७ |
| सातारा | २५.३ | २२.९ |
| सांगली | २६.१ | २२.९ |
| सोलापूर | २८.२ | २३.८ |
| वर्धा | ३०.७ | २३.८ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम आपले कर्तृत्व आणि कुवत सिद्ध करण्याच्या संधी मिळतील.

**तुळ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर व्यापारी व्यवहाराचा नेम का कल लक्षात घेऊन व्यवहाराची दिशा ठरविणे आवश्यक ठरेल.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा :पश्चिम देवधर्म, पूजाअर्चा करण्यात वेळ कसा जाईल कळणार नाही. मानसिक समाधान मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम कामाच्या निमित्ताने केलेला प्रवास नफा देईल. आर्थिकदृष्ट्या होणाऱ्या वाटचाली वेगवान होतील.

**मिथुन :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: दक्षिण कायदेशीर पुरावे असलेले कागदपत्र गहाळ होणार नाही याची काळजी घ्या.

**धनु :** शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा :पश्चिम मनावर येणारी काही दडपणे दूर करण्यासाठी घरातील ज्येष्ठांचा सल्ला अवश्य घ्या.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण घरातील सदस्यांपैकी एखाद्या व्यक्तीचा वाढदिवस थाटामाटात साजरा कराल. आरोग्य उत्तम राहील.

**मकर :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा: उत्तर नोकरदारांना वरिष्ठांचे बोलणे सहन करावे लागेल. वृद्धांनी आपले पथ्यपाणी व तब्येत सांभाळावी.

**सिंह :** शुभ रंग:भूरा, शुभ दिशा:उत्तर वडीलधारी मंडळीनी दिलेला सल्ला घेऊन कामात केलेले बदल अफलातून यश देतील.

**कुंभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण बेकारांना कामधंदा मिळेल. अविवाहितांचे विवाहाचे प्रश्न सुटतील. आर्थिक प्रश्न सुटतील.

**कन्या :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर सामाजिकदृष्ट्या मोठे कार्यविश्व उभे करू शकाल. एखाद्या घरगुती कार्यक्रमाचे आयोजन कराल.

**मीन :** शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम थोरामोठ्यांच्या गाठीभेटीतून बौद्धिक वर्चस्वही सिद्ध करता येईल. बेकारांना कामधंदा मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२१



### आडवे शब्द

१. अचूक उपाय (ला.)
४. दोघे
७. परीक्षा करण्यात नापास!
११. अपेक्षित वेळेनंतर
१२. धार लाव!
१३. अटीची भाषा
१४. मनात उठणारे वादळ
१५. आपल्या डोक्यावरची निळी छत्री
१८. खोडसाळ, वात्रट
२०. पिकाचा गाळ
२२. प्राण्यांसाठी एक ज्ञानेंद्रियच
२३. वेगळाच इतिहास रचणाऱ्या बिहारच्या माजी मुख्यमंत्री
२४. अस्वल
२५. अल्प
२७. 'जैसे थे' परिस्थिती
२९. मरेपर्यंत
३१अ. दबाव
३२. लहान
३३. संगीतातील एक राग
३५. हार, सर
३६. वस्ती
३८. भांडणाची कळ
३९. कलावंत
४१. देशाचे नाणे
४२. आजूबाजूच्या परिस्थितीप्रमाणे रंग बदलणारा
४३. मार्गक्रमण
४५. त्वरेने, तत्परतेने
४७. नूतन
४८. नाश पावणारे
५०. आवाजाची गोंधळ
५१. विशेष
५३. मोत्याची पैदास करणारा प्राणी
५४. पुन्हा पुन्हा
५७. बाई
५८. मद्य
६०. जुगाराचा एक प्रकार
६१. थेट, सरळ
६३. शुष्कता, तीव्र ऊन
६४. शहाणा, सुंदर
६७. वडील
६९. राख
७२. व्याकूळ, घाबरलेला
७४. पेढ्याचा एक प्रकार
७५. कणीदार
७६. विखारी चेष्टा
७७. शिक्षा

### उभे शब्द

१. श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे घरगुती संबोधन
२. शाहिरी मराठीत 'माझ्याबरोबर'
३. नेमका तपशील
४. छाती
५. देवाचे असेल तर ठीक!
६. लकेर
७. समुद्रातील लाटांचा आवाज
८. भरजरी
९. रममाण, निमग्न
१०. कबूतर
१२. एक पंजाबी नाव
१६. ऐन
१७. चिडवण्यासाठी केलेले कृत्य
१९. सर्वस्व
२१. लेखक मतकरींचे नाव
२४अ. फळांचे पेय
२५. दोस्त
२६. शरीर
२८. पाताळ
२९. शिव्याशाप
३०. अंकित माणूस, गुप्तहेर
३१. शक्ती, जोर, बळ
३१अ. लाही–लाही
३३. हिमालयातील पांडवकालीन सरोवर
३४. वेडावाकडा
३५. खाणाखुणांवरून पाठलाग
३७. उंट हाकणारा
४०. पापडाच्या पिठाची गोळी
४१. हालचाल
४४. पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
४५. पटापटा
४६. '––– काय अन् फाटक्यात पाय!'
४९. पाठविलेला
५०. ऋणको, कर्ज घेणारा
५१. फुकटचंबूंमुळे पदराला लागणारा लोणच्यातील मसाला
५२. सदोदित
५५. वर्तमानपत्रातील कप्पा
५६. वेतन
५९. न केलेल्या गोष्टींचा पाश्चाताप
६०. महिरप, ६२. पशूंचे ओरडणे, ६५. विष
६६. सजावट
६७. विहीर
६८. माहूताकडील शस्त्र
७०. मीठ
७१. पलंग, बाज
७३. वाजवण्याची पेटी, फजितीचे वाद्य

### जम्बो शब्दकोडे क्र. १०२० चे उत्तर

आडवे उत्तर : १.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४. मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

उभे उत्तर : १.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६व्या जयंतीनिमित्त आढावा बैठक संपन्न

**पुणे : दैनिक संध्या**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त १ ऑगस्ट रोजी पुण्यात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या नियोजनासाठी पुणे महानगरपालिकेच्या महापौर दालनात गुरुवारी आढावा बैठक पार पडली. जयंती सोहळा शिस्तबद्ध, भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी विविध विभागांच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस उपमहापौर परशुराम वाडेकर, सन्माननीय सभासद वृषाली रिठे व प्रियांका शेंडगे उपस्थित होत्या. यावेळी पुणे शहर व जिल्हा मातंग समाजाचे सचिव दीपक कसबे, स्वागताध्यक्ष रविंद्र आरडे, पुणे शहर मातंग समाजाचे सचिव ॲड. महेश सकट यांच्यासह महापालिकेचे विविध विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. मुख्य अभियंता (विद्युत) मनीषा शेकटकर, उपायुक्त माधव जगताप, उपायुक्त आशा राऊत, सहाय्यक आयुक्त प्रदीप आव्हाड, प्रकाश वालगुडे आणि शीतल वाकडे यांनी आपल्या विभागांच्या तयारीची माहिती सादर केली. बैठकीत जयंतीनिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे नियोजन, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था, सुरक्षा, विद्युत व्यवस्था तसेच नागरिकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांना मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहण्याची अपेक्षा असून, कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने सर्व आवश्यक तयारी वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

## गोरक्षक सुधीर बहिरवाडे यांना साहस पुरस्कार जाहीर

**पुणे : दैनिक संध्या**



स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या १९१० मधील ऐतिहासिक उडीच्या स्मरणार्थ हर घर सावरकर प्रतिष्ठान, डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि पुणे नगर हिंदुसभा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २६ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता डेक्कन जिमखाना येथील आयएमडीआर कॉलेजच्या स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात साहस दिन पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, यावर्षीचा साहस पुरस्कार गोरक्षक सुधीर महादेव बहिरवाडे यांना प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती हर घर सावरकर चे प्रतिनिधी सूर्यकांत पाठक व रणजीत नातू ,अरुण अकोलकर यांनी दिली. या कार्यक्रमाला भारतीय वायुदलाचे निवृत्त विंग कमांडर व आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण तज्ज्ञ विनायक पुरुषोत्तम डावरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हिंदू आध्यात्मिक सेवा संस्था, पुणे शहराचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल आणि सात्यकी सावरकर यांची प्रमुख उपस्थिती यावेळी असणार आहे. सुधीर महादेव बहिरवाडे यांनी २००४ मध्ये विश्व हिंदू परिषद व बजरंग दलामधून कार्यास सुरुवात केली. २०१६ मध्ये हिंदू महासभेत प्रवेश करून २०१७ मध्ये सोलापूर शहराध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. २०१९ पासून ते अखिल भारत कृषी गोसेवा संघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. गोरक्षण, हिंदुत्ववादी आंदोलने, सीएए समर्थनार्थ महारॅली, शहरांच्या नामांतरासाठी स्वाक्षरी मोहीम आणि वक्फ बोर्डविरोधातील मोर्चा अशा विविध उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. या कार्यादरम्यान त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल झाले असून अटक व तडीपारची कारवाईही झाली. असे असतानाही ते हिंदुत्व आणि गोरक्षणाच्या कार्यात सक्रिय आहेत.

## फरासखाना पोलीस ठाण्यातील ऐतिहासिक हनुमान मूर्तीची कस्टडीतून मुक्तता करा

**पुणे : दैनिक संध्या**



स्वातंत्र्यवीर चापेकर बंधूंच्या क्रांतीकार्याचा देदिप्यमान वारसा लाभलेल्या आणि सध्या पुण्यातील फरासखाना पोलीस ठाण्याच्या कस्टडीत असलेल्या ऐतिहासिक हनुमान मूर्तीची कायदेशीर मुक्तता करण्यात यावी. तसेच ही मूर्ती सार्वजनिक ठिकाणी स्थापित करून सर्वसामान्य भाविकांना दर्शनासाठी कायमस्वरूपी खुली करावी,या मागणीचे निवेदन हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या शिष्टमंडळाने पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-१, पुणे शहर) यांच्या कार्यालयात दिले. निवेदन देण्यासाठी शिष्टमंडळ गेले होते; परंतु पोलीस उपायुक्त यांची भेट होऊ न शकल्याने शिष्टमंडळाने हे निवेदन त्यांच्या कार्यालयात रीतसर इनवर्ड केले आहे. हे निवेदन देण्यासाठी हिंदू जनजागृती समितीचे श्री. पराग गोखले, हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे श्री. सचिन घुले, विश्व हिंदु परिषद-बजरंग दलाच्या सौ. पद्मजा मधुकर पाटील, धर्मप्रेमी कु. पूर्वा धनंजय पाटील, श्री. कृष्णाजी पाटील आणि अन्य कार्यकर्ते त्या ठिकाणी उपस्थित होते.

## रविवारपासून दगडूशेठ गणपती मंदिरात सलग २१ दिवसांचा अतिरुद्र महायज्ञ

**पुणे : दैनिक संध्या**

केवळ धार्मिक विधी नाही, तर सामूहिक आध्यात्मिक जागरण असलेला सलग २१ दिवसांचा अतिरुद्र महायज्ञ श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात रविवार, दि. २६ जुलै पासून सुरु होणार आहे. संपूर्ण विश्वात शांती व सद्भावना निर्मितीकरिता श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळा च्यावतीने आयोजित अतिरुद्र महायागात तब्बल ६५ ब्रह्मवृंद सहभागी होणार असून दि. २६ जुलै ते १५ ऑगस्ट दरम्यान दररोज दुपारी १ ते सायंकाळी ७ यावेळेत मंदिरात हा महायाग होणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली. अतिरुद्र महायागाचे हे ६ वे वर्ष आहे. मंदिराच्या सभामंडपात भव्य होमकुंड साकारुन हे अतिरुद्र होम करण्यात येणार आहे. वेदमूर्ती नटराज शास्त्री यांसह ६५ ब्रह्मवृंद यामध्ये सहभागी होतील. रविवार, दि. २६ जुलै रोजी महासंकल्प, नांदी श्राद्ध, वैष्णव श्राद्ध, पुण्याह वाचन, महान्यास, गणेश अर्चना, रुद्र जप, गणेश याग, रुद्र होम, अरुणाप्रश्न यागाने अतिरुद्र महायज्ञास प्रारंभ होईल. तर, पुढील २० दिवसांत दररोज गणेशयाग, रुद्र होम, महंण्यास मंत्रघोष होणार असून दुर्गा होम, स्वयंवर पार्वती होम, नक्षत्र होम, पुरुषसुक्त होम, महासुदर्शन होम, संतान गोपाल कृष्ण होम, मेधा दक्षिणा मूर्ती होम यांसह दररोज विविध धार्मिक विधी होणार आहेत. अतिरुद्र यज्ञ ही केवळ पूजा नसून, एक आध्यात्मिक ऊर्जा प्रक्षेपण आहे.

# इंदिरा आयव्हीएफच्या नव्या फर्टिलिटी सेंटरचे बाणेर येथे केले उद्‌घाटन

**■ पुणे (दै. संध्या)**



भारतातील अग्रगण्य फर्टिलिटी सर्व्हिस प्रोव्हायडर्सपैकी एक असलेल्या इंदिरा आयव्हीएफने बाणेर, पुणे येथे आपल्या नव्या फर्टिलिटी सेंटरचे उद्‌घाटन केले आहे. हे ग्रुपचे पुण्यातील ७ वे क्लिनिक आहे. महाराष्ट्रातील वेगाने वाढणाऱ्या रहिवासी भागांमध्ये राहणाऱ्या लोकांपर्यंत आणि जोडप्यांपर्यंत संपूर्ण फर्टिलिटी केअर आणि रिप्रोडक्टिव्ह हेल्थकेअरची सुविधा पोहोचवण्याच्या दिशेने हे आणखी एक पाऊल आहे. हे सेंटर सेकंड फ्लोअरला कमर्शियल, बाणेर मेन रोड, रिजन्सी कॉस्मॉस बिल्डिंगजवळ, ट्रेंड्स स्टोअरजवळ, पुणे येथे सुरू करण्यात आले आहे. फर्टिलिटी आणि असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह सर्व्हिसेसच्या संपूर्ण सुविधांनी सुसज्ज असलेले हे सेंटर रुग्णांना इंदिरा आयव्हीएफच्या स्टँडर्ड क्लिनिकल प्रोटोकॉल, लॅबोरेटरी सिस्टम आणि पेशंट केअर प्रोसेसेसच्या माध्यमातून उपचार सेवा देईल.

उद्‌घाटन समारंभात विशेष पाहुणे झोनल बिझनेस डायरेक्टर अँड सेंटर हेड इंदिरा आयव्हीएफ पुणे डॉ. अमोल लुंकड, स्पेशल गेस्ट डॉ. शशिकांत आव्हाड, स्त्रीरोगतज्ज्ञ व आयव्हीएफ विशेषज्ञ, इंदिरा आयव्हीएफ, पिंपरी-चिंचवड, पुणे, या प्रसंगी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अँड सेंटर हेड इंदिरा आयव्हीएफ बानेर डॉ. जयदीप काळे तसेच वरिष्ठ वैद्यकीय व्यावसायिक आणि प्रतिनिधींनीही सहभाग घेतला.

विस्तारावर भर देत इंदिरा आयव्हीएफ लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर नितीज मुर्डिया यांनी सांगितले की, पुणे हे एक महत्त्वाचे हेल्थकेअर हब बनले आहे आणि इथे ऑर्गनाइज्ड फर्टिलिटी सर्व्हिस वेगाने वाढत आहे. बाणेर येथील आमचा विस्तार सेंटर्सच्या मोठ्या नेटवर्कच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोच वाढवण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे. त्याचबरोबर, आम्ही प्रत्येक इंदिरा आयव्हीएफ क्लिनिकमध्ये क्लिनिकल प्रोटोकॉल, लॅबोरेटरी सिस्टम आणि रुग्णांच्या केअरचा समान स्टँडर्ड राखण्यासाठीही कटिबद्ध आहोत.

झोनल बिझनेस डायरेक्टर अँड सेंटर हेड इंदिरा आयव्हीएफ पुणे डॉ. अमोल लुंकड यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत फर्टिलिटीबाबत जागरूकता वाढली आहे आणि अधिकाधिक लोक सुरुवातीच्या टप्प्यातच वैद्यकीय सल्ला घेण्यासाठी पुढे येत आहेत. बाणेर सेंटर याच सकारात्मक बदलाला पाठबळ देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. हे सेंटर स्टँडर्ड क्लिनिकल आणि लॅबोरेटरी प्रॅक्टिसच्या माध्यमातून स्ट्रक्चर्ड फर्टिलिटी तपासणी, एव्हिडन्स बेस्ड ट्रीटमेंट प्लॅनिंग आणि निरंतर केअरची सुविधा देते.

डॉ. शशिकांत आव्हाड, स्त्रीरोगतज्ज्ञ व आयव्हीएफ विशेषज्ञ, इंदिरा आयव्हीएफ, पिंपरी-चिंचवड, पुणे यांनी सांगितले की, फर्टिलिटी ट्रीटमेंट केवळ वैद्यकीय प्रोसीजर्सपुरते मर्यादित नसते. यासाठी प्रत्येक रुग्णाच्या क्लिनिकल प्रोफाइलनुसार योग्य काउन्सेलिंग, स्पष्ट चर्चा आणि पर्सनलाइज्ड ट्रीटमेंट प्लॅनिंगची गरज असते. बाणेर सेंटरमध्ये आमचे उद्दिष्ट असे वातावरण उपलब्ध करून देणे आहे, जिथे रुग्णांना त्यांच्या फर्टिलिटी प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर संपूर्ण मार्गदर्शन मिळू शकेल. एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अँड इंदिरा आयव्हीएफ बाणेर सेंटर हेड डॉ. जयदीप काळे यांनी सांगितले की, इथे सेंटर सुरू झाल्यामुळे आम्ही रुग्णांना त्यांच्याच परिसरात सेवा देत आहोत, ज्यामुळे त्यांना दूरच्या शहरांमध्ये प्रवास करण्याची गरज राहणार नाही आणि उपचारही सातत्याने सुरू राहतील. आमची टीम परस्पर समन्वयाने पेशंट-केंद्रित पद्धतीने पुरुष आणि महिलांच्या फर्टिलिटीच्या तपासणीत मदत करण्यासाठी कटिबद्ध आहे, ज्यामध्ये क्लिनिकल तज्ज्ञता आणि आपुलकीने केअर यांचाही समावेश आहे.

या उद्‌घाटनासोबत इंदिरा आयव्हीएफने आपला राष्ट्रीय विस्तार सुरू ठेवला आहे, हे सेंटर संपूर्ण भारतातील २०० क्लिनिकांच्या नेटवर्कमध्ये जोडले गेले आहे. बाणेर सेंटर पुरुष आणि महिला दोघांच्याही वंधत्वासंबंधी समस्यांसाठी फर्टिलिटी आणि असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह सर्व्हिसेस देईल, ज्यांना स्टँडर्ड लॅबोरेटरी प्रक्रिया, इलेक्ट्रॉनिक मेडिकल रेकॉर्ड्स आणि पेशंट सेफ्टी सिस्टमचे समर्थन मिळेल.

## शहरातील ढोल-ताशा पथकांचे प्रतिनिधिक वाद्यपूजन

**■ पुणे (दै. संध्या)**



ढोल ताशा महासंघ, महाराष्ट्र यांच्या वतीने पुणे शहरातील सर्व ढोल-ताशा पथकांच्या प्रतिनिधिक वाद्यपूजनाचा कार्यक्रम ग्रामदैवत कसबा गणपती मंदिर येथे आयोजित करण्यात आला होता. विविध गणपती मंडळांचे पदाधिकारी तसेच शहरातील विविध ढोल-ताशा पथकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांच्या हस्ते या पारंपरिक वाद्यांचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, तुळशीबाग सार्वजनिक गणपती मंडळ ट्रस्ट चे नितीन पंडित, भाऊसाहेब रंगारी मंडळ ट्रस्ट चे पुनीत बालन , सरस्वती कराड हॉस्पिटलचे शिरीष भातलवंडे, जिलब्या गणपती सार्व मंडळ ट्रस्ट चे भूषण पंड्या तसेच ढोल ताशा महासंघ, महाराष्ट्रचे अध्यक्ष पराग ठाकूर, ॲड शिरीष थिटे, अक्षय बलकवडे, विलास शिगवण, अभिजीत कुमावत, प्रशांत तांबे, ओंकार कलढोणकर, अमर भालेराव आदी उपस्थित होते. महापौर मंजुषा नागपुरे म्हणाल्या, पुण्याचा गणेशोत्सव पाहण्यासाठी राज्यासह देशभरातून भाविक आणि पर्यटक येतात. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव अधिक सुयोग्य आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडावा, यासाठी पुणे महानगरपालिकेसह विविध संघटनांकडून करण्यात येणारी कामे एकाच छताखाली आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. पराग ठाकूर म्हणाले, गणेशोत्सवाच्या मिरवणुकीला उशीर झाला की त्याचे खापर अनेकदा ढोल-ताशा पथकांवर फोडले जाते. प्रत्यक्षात गणेशोत्सवाला शिस्तबद्ध स्वरूप देण्याचे मोठे काम ढोल-ताशा पथकांनी केले आहे. वादक हे आपल्या वादनातून श्रीगणेशाची सेवा आणि पूजा करतात. उत्सवामध्ये रंगत आणण्याचे काम ही वाद्यपथके करतात. सुमारे १५० दिवस सराव करून, आपल्या व्यस्त दिनचर्येतून वेळ काढून वादक गणेशसेवा करतात.

## 'माण–बालेवाडी' टप्पा सुरू करण्याचा निर्णय आता सरकारच्या कोर्टात

**■ पुणे (दै. संध्या)**

हिंजवडी- शिवाजीनगर मेट्रो मार्गावरील माण ते आर. के. लक्ष्मण म्युझियम (बालेवाडी) दरम्यान प्रवासी वाहतुकीसाठी आवश्यक असलेली परवानगी कमिश्नर ऑफ मेट्रो रेल्वे सेफ्टी (सीएमआरएस) कार्यालयाने दिल्याची माहिती पुणे महानगर क्षेत्र प्राधिकरणाने (पीएमआरडीए) शुक्रवारी दिली. त्यामुळे या मार्गावरील प्रवासी वाहतुकीचे उद्‌घाटन केंद्र - राज्य सरकार केव्हा करणार, याकडे आता प्रवाशांचे लक्ष लागले आहे. हिंजवडी आयटी पार्कला पुणे आणि पिंपरी चिंचवड या शहरांशी जोडणाऱ्या पुणे मेट्रो मार्गिका-३ मध्ये माण ते आर. के. लक्ष्मण म्युझियम दरम्यानच्या १२ स्थानकांवर प्रवासी वाहतूक सुरू करण्याचे नियोजन आहे. या मार्गावरील मेट्रो सेवा लवकरात लवकर सुरू व्हावी, यासाठी वारंवार पाठपुरावा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर 'सीएमआरएस'ने 'पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड' (पीआयसीटीएमआरएल) च्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ५ ते ८ जुलै दरम्यान पाहणी केली होती. त्यानंतर त्यांनी काही बदल सुचविले होते. टाटा मेट्रोकडून त्यांची पूर्तता झाल्यावर त्यांना प्रवासी वाहतुकीसाठी परवानगी देण्यात आली आहे. या मार्गावर आता मेट्रो ताशी ८० किलोमीटर वेगाने आता धावू शकेल. सुमारे १३ किलोमीटर लांबीचा हा दुहेरी मार्ग ७५० व्होल्ट डीसी थर्ड रेल ट्रॅक्शन प्रणालीवर कार्यरत राहणार आहे.

## आयुर्वेदाचार्य वैद्य पराग दाते यांना यशस्वी युवा वैद्य पुरस्कार जाहीर

**■ पुणे (दै. संध्या)**



वैद्य लावगनकर परिवारातर्फे आणि लिडजेन आयुर्वेदिक्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या वतीने कै. वैद्य चंद्रकांत उर्फ नाना लावगनकर स्मृतिप्रीत्यर्थ यशस्वी युवा वैद्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रत्नागिरीचे आयुर्वेदाचार्य वैद्य पराग दाते यांना यंदाचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती आयोजक वैद्य लक्ष्मण लावगनकर यांनी दिली. रविवार, दिनांक २६ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वाजता पटवर्धन बागेतील धन्वंतरी सभागृहात कार्यक्रम होणार आहे. आयुर्वेद वाचस्पती ज्येष्ठ नामांकित वैद्य त्रिलोक धोपेश्वरकर हे प्रमुख पाहुणे आणि वक्ते म्हणून उपस्थित रहाणार आहेत. त्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून या निमित्ताने 'आयुर्वेदीय निदानाचे महत्व' या विषयावर ते बोलणार आहेत. आयुर्वेदाच्या प्रचार आणि प्रसारासाठी आयुष्य झिजवणाऱ्या कै. वैद्य चंद्रकांत उर्फ नाना लावगनकर यांनी वैद्यपरंपरेत स्वतःचा ठसा उमटवला आहे. उत्तमोत्तम वैद्य घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे त्यांच्या विचारांचा नंदादीप तेवत ठेवण्यासाठी त्यांच्या पुढच्या पिढीने युवा वैद्य पुरस्काराचे आयोजन करण्यात येते. पुरस्काराचे यंदा सहावे वर्ष आहे.

## उलगडले ग्वाल्हेर घराण्याच्या उपशास्त्रीय संगीताचे बारकावे

### भारती विद्यापीठात पं. जयंत खोत यांची दोन दिवसीय कार्यशाळा

**■ पुणे (दै. संध्या)**



भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाच्या स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सतर्फे आयोजित दोन दिवसीय उपशास्त्रीय संगीत कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उपशास्त्रीय संगीताचे विविध प्रकार शिकत त्यामागील सौंदर्य, बारकावे आणि वैशिष्ट्ये अनुभवली. ग्वाल्हेर घराण्याचे ज्येष्ठ गायक तसेच संगीत नाटक अकादमी, उत्तर प्रदेशचे अध्यक्ष पं. जयंत खोत यांनी विद्यार्थ्यांना उपशास्त्रीय संगीताचे सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या प्रारंभी स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सचे संचालक प्रा. शारंगधर साठे यांनी कार्यशाळेचे महत्त्व विशद केले. संगीत विभागप्रमुख डॉ. प्रवीण कासलीकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी गुरु विदुषी अंजली मालकर, गायक अंगद गायकवाड तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यशाळेत पं. खोत यांनी ग्वाल्हेर घराण्यातील टप्पा, टपख्याल, त्रिवट, चतरंग, अष्टपदी आदी उपशास्त्रीय गायनप्रकारांची माहिती देत त्यांचे सादरीकरण आणि वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. प्रत्येक गायनप्रकार त्याचे वैशिष्ट्य जपत प्रभावीपणे कसा सादर करावा, याचे त्यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. टप्पा गायनाचे प्रशिक्षण देताना त्यांनी यमन आणि बिहाग रागांतील टपख्याल शिकविले. त्यानंतर खमाज, काफी, तिलंग, झिंजोटी आदी रागांतील तसेच विविध तालांतील टप्प्यांचा अभ्यास विद्यार्थ्यांकडून करून घेतला. दुसऱ्या दिवशी ग्वाल्हेर घराण्याचे वैशिष्ट्य असलेल्या अष्टपदीपासून सत्राची सुरुवात झाली. विविध रागांतील अष्टपदी, चतरंग आणि रास या गायनप्रकारांचेही प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. या कार्यशाळेमुळे संगीत आणि नृत्य विभागातील विद्यार्थ्यांना उपशास्त्रीय संगीताचे सौंदर्य, भावाभिव्यक्ती, शब्दोच्चार आणि स्वरफेक यांचा सखोल परिचय झाला. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# 'रायव्हल्स' तर्फे पुण्यातून 'कॉलेज रायव्हल्स सीझन ४' ची केली सुरुवात

### या उपक्रमाचा पुणे टप्पा २० ते ३१ जुलै दरम्यान चालणार असून, यात भारतातील इतर शहरांमध्ये जाण्यापूर्वी १० शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी सहभागी होणार आहेत

**■ पुणे (दै. संध्या)**




'ॲम्पव्हर्स डीएमआय'चा गेमिंग आणि एंटरटेनमेंट प्लॅटफॉर्म "रायव्हल्स" आता व्यावसायिक ई-स्पोर्ट्स आणि गेमिंगच्या क्षेत्रात मोठा विस्तार करत आहे. या विस्ताराचा भाग म्हणून रायव्हल्सने 'प्रो रायव्हल्स' या नव्या राष्ट्रीय ई-स्पोर्ट्स स्पर्धेची घोषणा केली आहे. यासोबतच 'कॉलेज रायव्हल्स'चा आतापर्यंतचा सर्वात मोठा चौथा सीझनही सुरू झाला आहे.

'प्रो रायव्हल्स'ची पहिली आवृत्ती १७ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित केली जात आहे. सहा फेऱ्यांच्या या राष्ट्रीय स्पर्धेसाठी देशभरातून जवळपास १,००० संघांनी सहभाग नोंदवला आहे. या स्पर्धेत एकूण ७ लाख रुपयांची बक्षीस रक्कम ठेवली आहे; ज्यामध्ये विजेत्या संघाला ३ लाख रुपये, उपविजेत्याला २ लाख रुपये आणि तिसऱ्या क्रमांकावरील संघाला १ लाख रुपये दिले जातील. तसेच, 'मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर' आणि 'फॅन फेव्हरेट' यांना वैयक्तिक पुरस्कार दिले जातील आणि प्रत्येक विजेत्याला ५०,००० रुपये मिळतील. पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या या स्पर्धेची सांगता भारताच्या आघाडीच्या संघांमधील 'प्रो रायव्हल्स' चॅम्पियनशिपचे पहिले विजेतेपद मिळवण्यासाठीच्या अंतिम लढतीने होईल.

ॲम्पव्हर्सचे सह-संस्थापक आणि ग्रुप सीईओ, चार्ली बेली म्हणाले, ""प्रो रायव्हल्स'हे 'रायव्हल्स' प्लॅटफॉर्मच्या उत्क्रांतीमधील पुढचे पाऊल आहे. गेमिंग समुदाय जसजसे प्रगल्भ होत आहेत, तसतसे खेळाडू उच्च स्तरावर स्पर्धा करण्याच्या आणि अधिक सक्षम प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध स्वतःला आव्हान देण्याच्या संधी शोधत आहेत. 'प्रो रायव्हल्स'च्या माध्यमातून आम्ही 'रायव्हल्स'चा अनुभव कॅम्पसच्या पलीकडे नेत आहोत. आम्ही स्पर्धात्मक खेळासाठी एक नवीन व्यासपीठ तयार केले आहे, जे 'कॉलेज रायव्हल्स'ला पूरक ठरेल आणि संपूर्ण 'रायव्हल्स' इको सिस्टीमला बळकट करेल." 'कॉलेज रायव्हल्स सीझन ४'ने पुण्यातून आपल्या देशव्यापी प्रवासाची सुरुवात केली आहे, ज्यामुळे विद्यार्थी आणि गेमिंगचे एक प्रमुख केंद्र म्हणून या शहराचे स्थान पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अजिंक्य डी. वाय. पाटील, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ((व्हीआयआयटी), एआयएसएसएमएस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, एनएमआयईटी पुणे, डी.वाय.पाटील वराळे, श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, सिंहगड एसबीएनएसटीएस आणि डी.वाय.पाटील आकुर्डी अशा १० नामांकित महाविद्यालयांमध्ये हा पुणे टप्पा दोन आठवड्यांत राबविला जाईल. त्यानंतर हा उपक्रम देशभरातील ४० हून अधिक शहरांमधील १०० हून अधिक महाविद्यालयांच्या कॅम्पसपर्यंत विस्तारला जाईल.

विद्यार्थी बीजीएमआय सोलो, जीएमआय फीमेल, जीएमआय स्क्वाड आणि ईए स्पोर्ट्स एफसी मोबाइल या स्पर्धांमध्ये भाग घेतील, तसेच 'रायव्हल्स आर्केड' द्वारे कम्युनिटी गेमिंगचा अनुभव घेतील. चौथ्या पर्वामध्ये काही निवडक कॅम्पसवर स्पर्धात्मक प्रकार म्हणून बुद्धिबळाचा देखील समाविष्ट करण्यात आले आहे, ज्यामुळे या प्लॅटफॉर्मच्या गेमिंग पोर्टफोलिओचा विस्तार होईल आणि विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी नवीन संधी निर्माण होतील.

ॲम्पव्हर्स डीएमआय च्या इंडिया बिझनेस हेड, सुमेधा महाजन म्हणाल्या, "पुणे ही नेहमीच आमच्यासाठी सर्वात मजबूत बाजारपेठांपैकी एक राहिली आहे. येथे अत्यंत उत्साही विद्यार्थी समुदाय आहे आणि गेल्या तीन सीझन्समध्ये सातत्याने प्रचंड सहभाग दिसून आला आहे. त्यामुळे 'कॉलेज रायव्हल्स सीझन ४' ची सुरुवात येथून करणे ही आमच्यासाठी स्वाभाविक बाब होती. शैक्षणिक उत्कृष्टता आणि बहरलेली युवा संस्कृती यांचा संगम असलेले शहर म्हणून, पुणे 'कॉलेज रायव्हल्स' च्या मूळ उद्देशाचे उत्तम प्रतिनिधित्व करते. या सीझनमध्ये, आम्ही अधिक कॅम्पसपर्यंत पोहोचून, नवीन स्पर्धात्मक प्रकार सादर करून आणि गेमिंग, मनोरंजन व युवा संस्कृतीशी जोडले जाण्यासाठी विद्यार्थ्यांना अधिक समृद्ध संधी उपलब्ध करून देऊन हा अनुभव एका नव्या उंचीवर नेत आहोत. यासोबतच, 'प्रो रिव्हल्स' हा उपक्रम 'रिव्हल्स' इकोसिस्टमचा कॅम्पसच्या पलीकडे विस्तार करतो आणि इच्छुक खेळाडूंना व्यावसायिक पातळीवर स्पर्धा करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देतो." भारतातील मोबाइल गेमिंग आणि ई-स्पोर्ट्स बाजारपेठेचे मूल्य २०२५ मध्ये १.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतके असल्याचा अंदाज होता आणि २०२९ पर्यंत ते २.४ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या क्षेत्रातील सहभाग जसजसा वाढत आहे, तसतसे या उद्योगाच्या विकासाच्या पुढील टप्प्याला आकार देण्यात सुनियोजित स्पर्धा आणि समुदायाद्वारे चालवल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्म्सची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण ठरेल अशी अपेक्षा आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### क्रिॲलिटी आणि वॉल 3डी कडून पहिले अनुभवात्मक' 3डी प्रिंटिंग रिटेल स्टोअर सुरु

पुणे (दैनिक संध्या) : ३डी प्रिंटिंगमधील जागतिक अग्रणी कंपनी क्रिॲलिटी आणि भारतातील अग्रगण्य ३डी प्रिंटिंग कंपनी वॉल ३डी यांनी पुण्यातील कोरेगाव पार्क येथील कोपा मॉलमध्ये शहरातील पहिले 'अनुभवात्मक' ३डी प्रिंटिंग रिटेल स्टोअर सुरू केले आहे. या स्टोअरमध्ये, ग्राहक थेट ३डी प्रिंटिंग पाहू शकतात आणि डिजिटल संकल्पनांचे मूर्त वस्तूंमध्ये कसे रूपांतर होते याचा अनुभव घेऊ शकतात.क्रिएटर्स, विद्यार्थी, व्यावसायिक, छंदिष्ट आणि तंत्रज्ञानप्रेमींसाठी ३डी प्रिंटिंग अधिक सुलभ, संवादात्मक आणि आकर्षक बनवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. २९ मे २०२६ रोजी हाँगकाँग स्टॉक एक्सचेंजवर सूचीबद्ध झाल्यानंतर, जगभरात आपली ऑफलाइन रिटेल उपस्थिती वाढवण्यासाठी क्रिॲलिटी ने केलेल्या सततच्या गुंतवणुकीचेही हे द्योतक आहे. पुण्यातील लोकप्रिय जीवनशैली केंद्र असलेल्या कोपा मॉलच्या दुसऱ्या मजल्यावर असलेले हे स्टोअर, प्रत्यक्ष हाताळणीचा आणि संवादात्मक ३डी प्रिंटिंगचा अनुभव देते. येथे एक कार्यरत क्रिॲलिटी प्रिंटर आणि विविध रंगांचे फिलामेंट उपलब्ध आहेत. वॉल ३डी चे तज्ञ अभ्यागतांना ३डी प्रिंटिंग तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी आणि वापरण्यासाठी मदत करण्यास उपलब्ध आहेत. वॉल ३डी चे सीईओ राहुल चंडालिया म्हणाले, "कोपा मॉलमध्ये आमचे पहिले ३डी प्रिंटिंग रिटेल स्टोअर उघडण्यासाठी क्रिॲलिटी सोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. या स्टोअरद्वारे, ३डी प्रिंटिंगला लोकांच्या अधिक जवळ आणणे आणि एक असे ठिकाण तयार करणे हे आमचे ध्येय आहे, जिथे ते हे तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहू शकतील, समजू शकतील आणि अनुभवू शकतील. क्रिएटर, विद्यार्थी, व्यावसायिक, हौशी किंवा ३डी प्रिंटिंगबद्दल फक्त उत्सुक असलेल्या प्रत्येकासाठी हे स्टोअर डिझाइन करण्यात आले आहे."

### नेस्ले इंडियाच्या विक्रीत 25.4 टक्क्यांची वाढ; पहिल्या तिमाहीत 975 कोटींचा नफा


पुणे (दैनिक संध्या) : नेस्ले इंडियाने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. मजबूत विक्री प्रमाणाच्या जोरावर कंपनीच्या विक्रीत २५.४ टक्क्यांची वाढ झाली असून ती ६,३६३.३ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. कंपनीचा करानंतरचा नफा ९७५.१ कोटी रुपये राहिला असून मागील वर्षाच्या याच तिमाहीच्या तुलनेत त्यात ४७.९ टक्क्यांची वाढ झाली आहे. नेस्ले इंडियाच्या संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीच्या आर्थिक निकालांना मंजुरी दिली. कंपनीच्या सर्व चार उत्पादन गटांनी मजबूत दुहेरी अंकी वाढ नोंदवली आहे. विविध विक्री माध्यमांमधील उच्च दुहेरी अंकी वाढीमुळे कंपनीच्या कामगिरीला बळ मिळाले. निकालांबाबत नेस्ले इंडियाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मनीष तिवारी म्हणाले की, मजबूत विक्री प्रमाणामुळे कंपनीने उत्तम तिमाही नोंदवली आहे. कंपनीच्या ब्रँड्सवरील ग्राहकांचा सातत्यपूर्ण विश्वास आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे ही वाढ साध्य झाली. भू-राजकीय आव्हाने कायम असतानाही निर्यात व्यवसायात ३५.६ टक्क्यांची वाढ झाली आहे. तिमाहीत कंपनीने परिचालन खर्चात बचत करण्याच्या प्रयत्नांना वेग दिला. त्याचवेळी ब्रँड्सवरील गुंतवणूकही वाढवली. जाहिरातींवरील खर्चात ४० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाली, तर EBITDA मार्जिन २४.२ टक्के राहिले. कन्फेक्शनरी उत्पादन गटाने विक्री प्रमाणाच्या जोरावर दुहेरी अंकी वाढ साधली. प्रीमियम उत्पादनांची वाढती मागणी आणि ई-कॉमर्सच्या वाढत्या योगदानामुळे या विभागाला फायदा झाला. KITKAT नेही बाजारातील आपला वाटा वाढवला. पावडर आणि द्रवरूप पेय उत्पादन गटाने सलग २०व्या तिमाहीत दुहेरी अंकी वाढ नोंदवली. तयार खाद्यपदार्थ आणि स्वयंपाकासाठीच्या उत्पादनांच्या गटानेही मजबूत दुहेरी अंकी वाढ नोंदवली. शहरी ग्राहकांशी वाढलेला संपर्क, ग्रामीण बाजारपेठांमधील विस्तार आणि नवीन उत्पादनांवर दिलेला भर यामुळे कंपनीची बाजारपेठेतील पोहोच वाढली.

# कॅलिफोर्निया बदामांना तुमच्या नाश्त्यात स्थान का मिळायला हवे?

आरोग्य आणि सजग पोषणाविषयीची जागरूकता सातत्याने वाढत असताना, तज्ज्ञ ग्राहकांना वास्तववादी आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या सवयी अंगीकारण्यावर भर देण्याचा सल्ला देत आहेत. कॅलिफोर्निया बदामांसारख्या पोषकतत्त्वांनी समृद्ध अन्नाचा नाश्त्यात समावेश करणे ही अशीच एक सोपी सवय आहे, जी आधुनिक जीवनशैलीत सहजपणे अंगीकारता येते आणि एकूण आरोग्याला पाठबळ देते.

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

ग्राहकांमध्ये अधिक आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार करण्यावर वाढता भर दिला जात असल्याने, साध्या आणि शाश्वत सवयी अंगीकारणे हे दीर्घकालीन आरोग्य आणि निरोगीपणाला पाठबळ देण्याचा महत्त्वाचा भाग बनले आहे. दिवसाची सुरुवात संतुलित नाश्त्याने केल्यास ऊर्जा पातळी टिकवून ठेवण्यास मदत होते आणि दिवसभर सजगपणे आहार निवडण्यासही प्रोत्साहन मिळते. मात्र, व्यस्त वेळापत्रक आणि धावपळीच्या सकाळीमुळे अनेकदा नाश्ता टाळला जातो किंवा संतुलित पोषण न देणाऱ्या सोयीस्कर पर्यायांची निवड केली जाते. पोषणतज्ज्ञांच्या मते, सकाळच्या छोट्या आणि व्यावहारिक सवयी अंगीकारल्यास संपूर्ण दिनचर्येत मोठे बदल न करता लोकांना सातत्याने अधिक चांगल्या पद्धतीने आहार घेण्यास मदत होऊ शकते.



तज्ज्ञांचे मत आहे की, नाश्ता अधिक पौष्टिक बनवण्याचा एक सोपा मार्ग म्हणजे कॅलिफोर्निया बदामांसारख्या पोषकतत्त्वांनी समृद्ध अन्नपदार्थांचा समावेश करणे. नैसर्गिकरित्या बहुउपयोगी आणि सहज उपलब्ध असलेले कॅलिफोर्निया बदाम प्रथिने, आरोग्यदायी चरबी, आहारातील तंतू (डाएटरी फायबर), मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन ई यांसह २४ पोषकतत्त्वांनी समृद्ध आहेत, त्यामुळे संतुलित नाश्त्यात त्यांचा सहज समावेश करता येतो. त्यामध्ये पॉलीफेनॉल्स देखील असतात, जे आतड्यांतील सूक्ष्मजीवांच्या (गट मायक्रोबायोम) विविधतेला पाठबळ देण्यास मदत करतात. तसेच व्हिटॅमिन ई, झिंक, लोह आणि तांबे ही पोषकतत्त्वे रोगप्रतिकारक शक्तीच्या कार्याशी संबंधित आहेत. प्रथिने, फायबर आणि आरोग्यदायी चरबी यांचे संतुलित मिश्रण जठर रिकामे होण्याची प्रक्रिया मंदावण्यास आणि अधिक काळ तृप्तीची भावना टिकवून ठेवण्यास मदत करते. त्यामुळे आरोग्यदायी आहाराचा भाग म्हणून कॅलिफोर्निया बदामांचे सेवन केल्यास वजन व्यवस्थापनालाही मदत होऊ शकते.

सकाळच्या पहिल्याच आहाराद्वारे शरीराला योग्य पोषण देण्याचे महत्त्व अधोरेखित करताना, मॅक्स हेल्थकेअर येथील रीजनल हेड – डायटेटिक्स ऋतिका समद्दार म्हणाल्या, "दिवसातील पहिला आहार हा पुढील अनेक तासांसाठी पोषणाचा भक्कम पाया घालण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. मात्र, व्यस्त सकाळीमुळे अनेकजण नाश्ता टाळतात किंवा केवळ सोयीच्या दृष्टीने अन्नाची निवड करतात. अधिक आरोग्यदायी सवयी अंगीकारणे हे अवघड असण्याची गरज नाही. संतुलित नाश्त्यामध्ये पौष्टिक आणि पोषकतत्त्वांनी समृद्ध अन्नाचा समावेश केल्यास एकूण आरोग्य आणि दिवसभर टिकून राहणाऱ्या ऊर्जा पातळीला पाठबळ मिळू शकते. कालांतराने अशा छोट्या आणि सजग निवडी अधिक आरोग्यदायी जीवनशैली घडविण्यात मोलाचे योगदान देऊ शकतात."

आपले मत व्यक्त करताना, पोषण आणि वेलनेस सल्लागार शीला कृष्णस्वामी म्हणाल्या, "आरोग्यदायी आहार म्हणजे कठोर आहारनियमांचे पालन करणे किंवा जीवनशैलीत मोठे बदल करणे नव्हे. तो अशा सवयी विकसित करण्याबद्दल आहे, ज्या सातत्याने पाळणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य असते. संतुलित नाश्ता हा पोषकतत्त्वांनी समृद्ध अन्नपदार्थांचा समावेश करण्याची उत्तम संधी असते, जे शरीराला आवश्यक पोषण देण्याबरोबरच एकूण आरोग्य आणि निरोगीपणालाही पाठबळ देता."

व्यस्त जीवनशैली असूनही पोषणाला प्राधान्य कसे देते याबद्दल बोलताना, अभिनेत्री सोहा अली खान म्हणाल्या, "प्रत्येक सकाळ सारखी नसते, पण माझी दिनचर्या साधी ठेवली तर त्यात सातत्य राखणे खूप सोपे होते, हे मी शिकले आहे. मी माझ्या दिवसाची सुरुवात अशा पौष्टिक अन्नाने करण्याचा प्रयत्न करते, ज्यामुळे मला उत्साही वाटते आणि दिवसातील पुढील प्रत्येक गोष्टीसाठी तयार असल्याची भावना मिळते. कॅलिफोर्निया बदाम माझ्या नाश्त्याचा नियमित भाग बनले आहेत, कारण ते सहज सोबत नेता येतात, खाण्यास सोयीस्कर आहेत आणि नैसर्गिकरित्या पोषकतत्त्वांनी समृद्ध आहेत. मी घरी असो किंवा प्रवासात, ते माझ्या दिनचर्येत सहजपणे बसणाऱ्या त्या साध्या सवयींपैकी एक आहेत. माझा ठाम विश्वास आहे की, दीर्घकालीन निरोगीपणा हा परिपूर्णतेचा ध्यास घेण्यापेक्षा आपण दररोज घेत असलेल्या छोट्या-छोट्या निर्णयांमधूनच घडत असतो."

## विद्यार्थ्यांसाठी iQOO Z11 Lite 5G भारतात दाखल

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

स्मार्टफोन ब्रँड iQOO ने भारतीय बाजारात नवीन iQOO Z11 Lite 5G स्मार्टफोन सादर केला आहे. विशेषतः विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये 120Hz डिस्प्ले, MediaTek Dimensity 6300 प्रोसेसर, AI आधारित सुविधा आणि 6500mAh क्षमतेची बॅटरी देण्यात आली आहे. iQOO Z11 Lite 5G मध्ये 6.74 इंचाचा 120Hz डिस्प्ले असून त्याची कमाल ब्राइटनेस 1200 निट्सपर्यंत आहे. TÜV Rheinland लो ब्लू लाइट प्रमाणपत्रामुळे दीर्घकाळ अभ्यास, वाचन किंवा स्क्रीन वापरताना डोळ्यांवरील ताण कमी करण्यास मदत होते. फोनमध्ये 200 टक्के व्हॉल्यूम मोडही देण्यात आला आहे.

MediaTek Dimensity 6300 प्रोसेसरमुळे मल्टीटास्किंग, मनोरंजन आणि दैनंदिन वापरात वेगवान कामगिरी मिळते. यासोबत AI क्रिएशन, AI कॅप्शन्स आणि AI ट्रान्सक्रिप्ट असिस्ट यांसारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत.

स्मार्टफोनमध्ये 6500mAh




**6500mAh बॅटरी, AI वैशिष्ट्यांसह किंमत ₹19,499 पासून**

ब्लूव्होल्ट बॅटरी असून 44W फ्लॅशचार्जची सुविधा आहे. छायाचित्रणासाठी 50 मेगापिक्सलचा सोनी मुख्य सेन्सर देण्यात आला आहे. तसेच IP65 धूळ आणि पाणी प्रतिरोधक क्षमता, मेटॅलिक मॅट फ्रेम आणि डायनॅमिक लाईट डिझाइन ही त्याची अन्य वैशिष्ट्ये आहेत.

iQOO Z11 Lite 5G च्या 4GB + 128GB प्रकाराची किंमत ₹19,499, 6GB + 128GB प्रकाराची ₹21,499, तर 6GB + 256GB प्रकाराची ₹24,499 ठेवण्यात आली आहे. निवडक SBI आणि Axis Bank क्रेडिट कार्डवर ₹1,500 तत्काळ सूट मिळणार असल्याने प्रभावी किंमत अनुक्रमे ₹17,999, ₹19,999 आणि ₹22,999 इतकी होईल. तीन महिन्यांपर्यंत विनाव्याज हप्त्यांची सुविधाही उपलब्ध आहे.

## आषाढी एकादशी म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाचा प्राण : ह.भ.प प्रा. सचिन महाराज माथेफोड

**लोणी काळभोर (दै. संध्या) :**

वारी आषाढ शुद्ध एकादशी म्हटली की महाराष्ट्रातील प्रत्येक वारकऱ्याच्या अंतःकरणात एकच नाम घुमू लागते"रामकृष्ण हरी". पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी टाळ-मृदंगाच्या गजरात, हरिनामाचा अखंड जप करत, अनेक दिवसांची पायी वाटचाल करतात. ही वारी केवळ धार्मिक यात्रा नाही; ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाचा प्राण असल्याचे प्रतिपादन ह.भ.प प्रा. सचिन महाराज माथेफोड यांनी केले .

भारतीय भक्तीपरंपरेत भागवत धर्माला विशेष स्थान आहे. महाराष्ट्रात या भागवत धर्माला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचे महान कार्य संतपरंपरेने केले. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर माऊली, सोपानदेव, मुक्ताबाई, नामदेव महाराज, चोखामेळा, जनाबाई, सावता माळी, गोरा कुंभार, सेना महाराज, नरहरी सोनार, एकनाथ महाराज, तुकाराम महाराज अशा असंख्य संतांनी भक्तीला कर्म, ज्ञान आणि समाजप्रबोधनाची जोड दिली. त्यामुळे वारकरी



संप्रदाय हा केवळ धार्मिक संप्रदाय न राहता लोकजीवनाला दिशा देणारी जीवनपद्धती ठरला.

वारकरी संप्रदायाचा केंद्रबिंदू म्हणजे नामस्मरण. संतांनी वेद, उपनिषदे आणि गीतेतील गूढ तत्त्वज्ञान सामान्य माणसाच्या बोलीभाषेत सांगितले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) या ग्रंथातून भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविले. त्यांनी अध्यात्माला लोकभाषेचे रूप दिले. म्हणूनच ज्ञानेश्वरी ही केवळ ग्रंथसंपदा नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीचा श्वास आहे.

संत नामदेव महाराजांनी विठ्ठलभक्तीचा संदेश महाराष्ट्राबरोबरच पंजाबपर्यंत नेला. त्यांच्या अनेक रचना गुरू ग्रंथ साहिबा मध्ये देखील आहेत. यावरून त्यांच्या भक्तीचा व्यापक प्रभाव लक्षात येतो. भक्त आणि भगवंत यांच्यातील स्नेह, प्रेम आणि समर्पण हा त्यांच्या वाङ्मयाचा गाभा आहे.

संत चोखामेळा यांनी समाजातील अस्पृश्यतेच्या वेदना सहन करतानाही विठ्ठलावरील निष्ठा कधी ढळू दिली नाही. संत सावता माळी यांनी शेती करताना, संत गोरा कुंभार यांनी मातीची भांडी घडविताना, संत सेना महाराज यांनी आपल्या व्यवसायातून, तर संत नरहरी सोनार यांनी सुवर्णकाराचे काम करतानाच ईश्वरभक्तीचे श्रेष्ठ उदाहरण घालून दिले. याचा अर्थ स्पष्ट आहे—कर्तव्य करताना भगवंताचे स्मरण करणे, हाच वारकरी धर्माचा खरा संदेश आहे.

संत एकनाथ महाराजांनी भागवत धर्माला सामाजिक समतेची दिशा दिली. त्यांनी धर्म म्हणजे केवळ कर्मकांड नसून दया, क्षमा, सेवा आणि सदाचार असल्याचे आपल्या लेखनातून व आचरणातून दाखवून दिले. त्यांच्या एकनाथी भागवत आणि भावार्थ रामायण या ग्रंथांनी समाजमन घडविले.

संत तुकाराम महाराजांनी वारकरी संप्रदायाला जनमानसात अभूतपूर्व उंचीवर नेले. त्यांच्या अभंगांमध्ये अध्यात्म, नैतिकता, समाजप्रबोधन आणि आत्मपरीक्षण यांचा अद्भुत संगम दिसतो. त्यांनी स्पष्ट सांगितले—

"जे का रंजले गांजले ।
त्यासी म्हणे जो आपुले ॥"

या एका वचनात संपूर्ण भागवत धर्म सामावलेला आहे. दुःखी, पीडित आणि उपेक्षितांना आपले मानणे, हीच खरी विठ्ठलभक्ती आहे. त्याचप्रमाणे—

"वृक्षवल्ली आम्हा
सोयरी वनचरे ॥"

या अभंगातून संतांनी मानव आणि निसर्ग यांच्यातील आत्मीय नाते अधोरेखित केले. आज पर्यावरण संवर्धनाची चर्चा होत असताना संतांचा हा विचार अधिकच समर्पक वाटतो.

वारीची परंपरा ही शिस्त, समता आणि सेवाभाव यांचा जिवंत आदर्श आहे. दिंडीमध्ये चालताना कोणी मोठा-लहान नसतो. जाती, पंथ, भाषा, संपत्ती, पद यांचे सर्व भेद मागे पडतात. प्रत्येक जण "माऊली" म्हणूनच ओळखला जातो. हा समतेचा संस्कार भारतीय लोकशाहीच्या मूल्यांनाही बळ देणारा आहे.

# 'पंढरीची वारी, आर्थिक साक्षरता घरोघरी' उपक्रमाला प्रतिसाद

**सेबीच्या पुढाकाराने राबवलेली गुंतवणूकदार जागरूकता मोहीम पंढरपूरच्या वारकऱ्यांपर्यंत**



**पुणे (दै. संध्या) :**

वारीदरम्यान आर्थिक साक्षरता अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने राबवण्यात आलेल्या 'पंढरीची वारी, आर्थिक साक्षरता घरोघरी' या उपक्रमात सेबीसोबत बीएसई, एनएसई आणि ॲम्फी सहभागी झाले.

गुंतवणूकदार साक्षरता प्रत्येक घराघरांपर्यंत पोहोचवण्याच्या प्रयत्नांना पंढरपूर वारीदरम्यान अधिक गती मिळाली, जेव्हा सेबीने तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी बीएसई, एनएसई आणि ॲम्फीसोबत सहकार्य केले. २२ आणि २३ जुलै २०२६ रोजी पंढरपूर येथे आयोजित या दोन दिवशीय उपक्रमात वित्तीय जागरूकतेच्या उपक्रमांसोबतच वारकऱ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले.

या भव्य वारी सोहळ्यात सुमारे ३० लाख भाविक सहभागी होत असल्याने, ग्रामीण महाराष्ट्र आणि इतर राज्यांतील नागरिकांपर्यंत पोहोचण्याची एक उत्तम संधी या उपक्रमाद्वारे उपलब्ध झाली. या कार्यक्रमात हजारो वारकऱ्यांनी हजेरी लावली; ज्यामध्ये प्रामुख्याने शेतकरी कुटुंबे, लहान शहरे, गावे आणि पारंपरिक व्यावसायिक समुदायांतील व्यक्तींचा समावेश होता.

"पंढरीची वारी, आर्थिक साक्षरता घरोघरी" ही संकल्पना या मोहिमेचा मूळ उद्देश स्पष्ट करते—प्रत्येक कुटुंबासाठी आर्थिक साक्षरता सोपी, व्यावहारिक आणि सुलभ करणे. पंढरपूर येथे आर्थिक जागरूकतेचे स्टॉल्स उभारण्यात आले होते, जिथे प्रतिनिधींनी उपस्थितांशी संवाद साधून सुरक्षित गुंतवणुकीच्या महत्त्वाच्या पैलूंबद्दल मार्गदर्शन केले.

जागरूकता मोहिमेसोबतच, पावसाळ्यात पाठिंबा दर्शवण्यासाठी वारकऱ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. अशा प्रकारे, या उपक्रमाने लोकसेवा आणि गुंतवणूकदार शिक्षण यांचा मेळ घालत भाविकांच्या तातडीच्या गरजांशी हे आयोजन अधिक सुसंगत केले.

या कार्यक्रमात सेबीचे राहुल केलापुरे यांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय ठरली. संपूर्ण उपक्रमादरम्यान त्यांनी वारकरी आणि इतर उपस्थितांशी अत्यंत संयमाने संवाद साधला. सर्वसमावेशक गुंतवणूकदार शिक्षणाचे खंबीर पुरस्कर्ते असलेले केलापुरे यांनी विशेषतः पहिल्यांदाच अशा औपचारिक उपक्रमात सहभागी झालेल्या लोकांसाठी क्लिष्ट आर्थिक संकल्पना अत्यंत सोप्या आणि सहज समजेल अशा भाषेत स्पष्ट केल्या.


जेजुरी नगरपरिषद कार्यालय
जा.क्र.जेनपा/कावि/१७१३/२०२
दिनांक : २४/०७/२०२६

### जाहिर निविदा

जेजुरी नगरपरिषद जेजुरी ता. पुरंदर जि. पुणे खाली नमुद कलेल्या कर विभागाकडील कामांकरीता अनुभवी मान्यता प्राप्त व शासनांकडुन योग्य त्या वर्गातील ठेकेदारांकडुन सीलबंद निविदा/दरपत्रक मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | १५ ऑगस्ट स्वातंत्र दिन व २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन निमित्त शालेय विद्याथी यांना खाऊ वाटप करणे (बिस्कीट) |
| २ | जेजुरी नगरपरिषद कार्यालयातील विविध समारंभ, जयंती, पुण्यतिथी वेळी लागणारे हार, बुके, चक्र, फुले पुरविणे |
| ३ | जेजुरी नगरपरिषद कार्यालयात विविध कार्यक्रमावेळी फोटो काढून त्याच्या प्रती पुरविणे. व्हिडीओ शूटिंग करणे तसेच कार्यालयात साजरे होणारे कार्यक्रम समारंभावेळी फेटे, शाल इत्यादी पुरविणे |
| ४ | जेजुरी नगरपरिषद कार्यालयात वसुली कामी तसेच इतर वेळी दवंडी देणे कामी लागणारे वाहन (रिक्षा) स्पीकरसह पुरविणे |
| ५ | जेजुरी नगरपरिषद कार्यालयात १५ ऑगस्ट स्वातंत्र दिन व २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन निमित्त उल्लेखनीय कामगिरी केलेल्या नागरिकांना शिल्ड, चषक, प्रमाणपत्र, मेडल इत्यादी पुरविणे. |

सदरील कामाचे टेंडर फॉर्म/दरपत्रक सुटीचे दिवस सोडुन दिनांक २५/०७/२०२६ ते ०३/०८/२०२६ पर्यंत दुपारी २.०० वाजे पर्यंत स्वीकारल्या जातील त्या नंतर आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. कामासंबधी अधिक माहिती जेजुरी नगरपरीषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी


## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा दमदार तिमाही निकाल

**317 कोटींचा नफा, RoA गायडन्स वाढवली**

**पुणे (दै. संध्या) :**

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड [BSE: 542904; NSE: UJJIVANSFB] ने आज जून 2026 रोजी संपलेल्या तिमाहीसाठीची आर्थिक कामगिरी जाहीर केली. उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेच्या कार्यकारी संचालक सुश्री कॅरोल फुर्टाडो म्हणाल्या, "जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता कायम असतानाही देशांतर्गत उच्च-फ्रिक्वेन्सी आर्थिक निर्देशकांनी स्थैर्य दाखवले आहे. आरबीआय ने तटस्थ भूमिकेसह धोरणात्मक रेपो दर 5.25% वर कायम ठेवला असून, आर्थिक वर्ष 27 साठी वास्तविक GDP वाढीचा अंदाज सुधारित करून 6.6% केला आहे. तसेच संपूर्ण वर्षासाठी महागाई 5.1% राहून निर्धारित मर्यादेत राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. याचबरोबर बँकिंग क्षेत्रात कर्जाची निरोगी मागणी आणि स्थिर ठेवींसह लवचिकता कायम असल्याचेही नमूद केले आहे. बँकेने शाखा विस्तारासह विविध व्यवसाय विभागांमध्ये आणखी एका तिमाहीत मजबूत वाढ नोंदवली असून जून'26 अखेर शाखांची संख्या 814 वर पोहोचली आहे. ठेवी वार्षिक 24.6% आणि तिमाही ते तिमाही 5.4% ने वाढून 48,129 कोटी रु. झाल्या, तर एकूण लोन बुक वार्षिक 28.9% आणि तिमाही ते तिमाही 5.5% वाढून 42,903 कोटी रु.वर पोहोचले. मर्यादित तरलतेच्या परिस्थितीतही आम्ही सुमारे 89% CD Ratio आरामदायी पातळीवर राखला. बदलत्या बाजार परिस्थितीनुसार ALM उद्दिष्टांशी सुसंगत राहण्यासाठी महत्त्वाच्या विभागांमध्ये व्याजदर वाढ लागू केली. CASA ठेवी 12,930 कोटी रु.वर पोहोचल्या असून, त्यात वार्षिक 37.8% वाढ झाली आहे. ठेव ग्राहकांसाठीच्या उपक्रमांना, विशेषतः मजबूत आयव्हरी कार्यक्रमाच्या वाढीमुळे चांगला प्रतिसाद मिळत आहे. विमा उत्पादनांच्या क्रॉस-सेलमध्ये सुधारणा, डिजिटल माध्यमांतून वाढणारा म्युच्युअल फंड स्वीकार आणि लवकरच सुरू होणारे को ब्रँडेड क्रेडिट कार्ड यामुळे ग्राहकांचा सहभाग अधिक वाढत आहे. आर्थिक वर्ष 27 च्या पहिल्या तिमाहीमध्ये सुरक्षित कर्ज पोर्टफोलिओने दमदार वाढ नोंदवत वार्षिक 42.7% आणि तिमाही ते तिमाही 7.8% वाढीसह 21,638 कोटी रु.चा टप्पा गाठला असून तो एकूण लोनबुकच्या 50.4% आहे. तिमाहीतील कर्ज वितरण वार्षिक 41.4% वाढून 9,245 कोटी रु. झाले. मायक्रो बँकिंग पोर्टफोलिओ पहिल्या तिमाहीत वार्षिक 16.8% वाढून 21,371 कोटी रु. झाला. यामागे Bucket X मधील 99.68% इतकी मजबूत वसुली कार्यक्षमता आणि 1.72 लाख नवीन ग्राहकांची भर यांचा मोठा वाटा आहे.


### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/266/25 दिनांक:- 18.5.2026.

**नोटीस**

श्रीम तमिक सजन इनामदार रा. निमगाव सावा, ता. जुन्नर, जि पुणे- **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत निमगाव सावा - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार तमिक सजन इनामदार रा. निमगाव सावा, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **तमिक सजन इनामदार यांचा जन्म 01.01.1982 रोजी मौजे निमगाव सावा, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 266/25 दिनांक 12.09.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 18/5/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**



### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/267/25 दिनांक:- 13.5.2026.

**नोटीस**

श्री अली ईस्माईल पटेल रा. निमगाव सावा, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत निमगाव सावा - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार श्री अली ईस्माईल पटेल रा. निमगाव सावा, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **श्री अली ईस्माईल पटेल यांचा जन्म 07.08.1989 रोजी मौजे निमगाव सावा, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 267/25 दिनांक 12.09.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 13/5/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**



## थोडक्यात पण महत्वाचे

### ४ टक्के ऑनलाईन सवलत योजनेला मालमत्ताधारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मालमत्ता कराची वसुली अधिक प्रभावीपणे होण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. मालमत्ताधारकांना डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन मिळावे, नागरिकांचा वेळ वाचावा तसेच कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, या उद्देशाने १ जुलै २०२६ पासून ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करावर ४ टक्के सवलत लागू करण्यात आली आहे. ही योजना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सुरू राहणार असून नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे. १ एप्रिल २०२६ ते २२ जुलै २०२६ रोजी सकाळी दहा वाजेपर्यंत महापालिकेकडे ५४७ कोटी ९ लाख रुपयांचा मालमत्ता कर जमा झाला आहे. विशेष म्हणजे, १ जुलैपासून सुरू झालेल्या ४ टक्के सवलत योजनेचा अवघ्या २२ दिवसांत १३ हजार १४१ मालमत्ताधारकांनी लाभ घेतला आहे. त्यामुळे ऑनलाईन कर भरण्याकडे नागरिकांचा वाढता कल दिसून येत आहे. या मालमत्ताधारकांनी १५ कोटींचा ऑनलाईन भरणा केला आहे. कर भरण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी कर आकारणी व कर संकलन विभागाकडून व्यापक प्रचार मोहीम राबविण्यात येत आहे. सोशल मीडियावर पोस्ट, व्हिडिओ, जनजागृती संदेश विविध उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना वेळेत कर भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. याशिवाय दररोज सुमारे १ ते ३ लाख मालमत्ताधारकांना मोबाईलवर एसएमएस पाठवून ४ टक्के सवलत योजनेची माहिती दिली जात असून, मुदतीपूर्वी ऑनलाईन कर भरण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ४ टक्के सवलतीची मुदत उपलब्ध असल्याने ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप चालू आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांनी विलंब न करता ऑनलाईन कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

### मोशी कचरा डेपो दुर्घटना : मृतांच्या वारसांना आर्थिक मदत वितरणाची प्रक्रिया वेगाने सुरू

**पिंपरी : दैनिक संध्या**

मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या ९ नागरिकांच्या कायदेशीर वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून युद्धपातळीवर सुरू आहे. महापौर रवि लांडगे यांच्या निर्देशानुसार आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने हाती घेण्यात आली असून, कागदपत्रांची पूर्तता झालेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात आर्थिक मदतीची रक्कम थेट जमा करण्यात येत असल्याची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली. याअंतर्गत मृत सन्नी माने यांच्या कायदेशीर वारसांना एकूण १० लाख रुपयांची आर्थिक मदत प्रदान करण्यात आली असून, त्यांच्या पत्नी मनीषा सन्नी माने यांच्या खात्यात ५ लाख रुपये, तर आई फौजिया अझीम माने यांच्या खात्यात ५ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. तसेच मृत राहुल गायकवाड यांच्या कायदेशीर वारसांना एकूण १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली असून, त्यांच्या पत्नी भाग्यश्री राहुल गायकवाड यांच्या खात्यात ५ लाख रुपये, तर आई सरस्वती गायकवाड आणि वडील अर्जुन गायकवाड यांच्या खात्यात प्रत्येकी २.५० लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. याशिवाय मृत वामन कसबे यांच्या कायदेशीर वारस असलेल्या त्यांच्या पत्नी सुमन वामन कसबे यांच्या खात्यात १० लाख रुपयांची आर्थिक मदत जमा करण्यात आली आहे. यापूर्वी मृत अक्षय सावंत यांच्या कायदेशीर वारसांच्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांच्या खात्यातही नियमानुसार १० लाख रुपयांची आर्थिक मदत जमा करण्यात आली आहे.

### महापौर वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे उद्‍घाटन

**पिंपरी : दैनिक संध्या**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सर्वसामान्य नागरिकांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ सुलभपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महापौर वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे उद्‍घाटन आयुष्यमान भारत योजनेचे महाराष्ट्र राज्याचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळणार असून उपचारासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि समन्वयाची सुविधाही उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महापौर सहाय्यता निधी, आयुष्मान भारत योजना आणि महात्मा फुले जनआरोग्य योजना यांचा लाभ पात्र नागरिकांना सुलभपणे मिळावा, यासाठी या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. उपचारासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, अर्ज प्रक्रिया, संबंधित रुग्णालयांशी समन्वय तसेच लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी या कक्षामार्फत मदत केली जाणार आहे. पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक आणि कामगारनगरी असल्याने अनेक कुटुंबांना गंभीर आजारांच्या उपचारासाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन महापौर वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत पात्र रुग्णांना पाच लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. रुग्णालयात दाखल होण्यापासून ते उपचार पूर्ण होईपर्यंत आवश्यक मार्गदर्शन, कागदपत्रांची पूर्तता आणि समन्वयासाठी दोन आरोग्यमित्रांची कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात आली असून भविष्यात गरजेनुसार या सेवेचा विस्तारही करण्यात येणार आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी मनोज शिंदे (८४१२९९५५९९), अभिजित पानखेडे (९११२४०४१८१) यांच्याशी संपर्क साधावा किंवा टोल-फ्री हेल्पलाईन १८०० २३३ २२०० वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

### पिंपरी चिंचवड माऊंटेनिअरिंग क्लबची आणखी एक यशस्वी मोहीम

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड माऊंटेनिअरिंग क्लबच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. क्लबच्या १९ सदस्यांनी हिमाचल प्रदेशातील अत्यंत आव्हानात्मक 'पिन भाबा पास ट्रेक' यशस्वीपणे पूर्ण केला आहे. हिमाचल प्रदेशातील किन्नौर जिल्ह्यातील हिरव्यागार भाबा व्हॅली आणि स्पिती खोऱ्यातील खडकाळ पिन व्हॅली यांना जोडणारा हा ट्रेक देशातील सर्वात निसर्गरम्य आणि आव्हानात्मक ट्रेक पैकी एक मानला जातो. सुमारे १६,१०० फूट (४,९१५ मीटर) उंचीवर असलेला हा ट्रेक Moderate to Difficult श्रेणीत मोडतो. या ट्रेक मध्ये ५१ कि. मी.चे अंतर पायी पार करावे लागते. या मोहिमेचा कालावधी चंदीगड पासून साधारण ९ ते १० दिवसांचा होता. ट्रेकसाठी जुलै ते सप्टेंबर हा सर्वोत्तम काळ मानला जातो. उच्च उंची, कठीण चढाई, बदलणारे हवामान आणि विविध भौगोलिक परिस्थिती मुळे हा ट्रेक अनुभवी ट्रेकर्स साठीही मोठे आव्हान ठरतो. या ट्रेक चे वैशिष्ट्य म्हणजे निसर्गातील विलक्षण विरोधाभास. सुरुवातीला घनदाट जंगले, नद्या आणि हिरवीगार कुरणे अनुभवता येतात, तर पुढे बर्फाच्छादित आणि खडकाळ प्रदेशातून वाटचाल करावी लागते. पासवर पोहोचल्यानंतर एका बाजूला किन्नौर ची हिरवाई आणि दुसऱ्या बाजूला स्पितीचे ओसाड, तपकिरी डोंगरांचे अप्रतिम दृश्य पाहायला मिळते. पिंपरी चिंचवड माऊंटेनिअरिंग क्लबने यापूर्वीही माऊंट एल्ब्रुस, माऊंट मेरा पीक, बुरान घाटी ट्रेक, श्री पास ट्रेक, कालापत्थर आणि एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेक अशा अनेक यशस्वी मोहिमा पूर्ण केल्या आहेत.

## दिवंगत उप मुख्यमंत्री अजितदादा यांना अभिवादन

■ पिंपरी (दै. संध्या)



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी दूरदृष्टी ठेवून पायाभूत सुविधांसह विविध क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी राबविलेल्या विविध विकासात्मक उपक्रमांमुळे आधुनिक आणि सक्षम महाराष्ट्र घडविण्यात मोलाची भूमिका बजावली तसेच पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासातही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केले.

महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस महापौर रवि लांडगे व आमदार अमित गोरखे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले,त्यावेळी ते बोलत होते.

अभिवादन प्रसंगी आयुष्यमान भारत योजनेचे महाराष्ट्र प्रदेश प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे, आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, माजी महापौर योगेश बहल, डॉ.वैशाली घोडेकर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम,विक्रांत बगाडे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, शिवसेनेचे गटनेते विश्वजीत बारणे,नगरसदस्य शत्रुघ्न (बापू) काटे,जितेंद्र ननावरे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे,वर्षा जगताप, मनिषा लांडे, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी नगरसदस्य बबनराव गाढवे,माजी नगरसदस्या सीमा सावळे,आशा शेंडगे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,कर्मचारी महासंघाचे अभिषेक फुगे तसेच विविध विभागातील अधिकारी,कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी देखील दिवंगत माजी उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे आणि विकासाभिमुख कार्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रगतीला नवी दिशा मिळाली असून, त्यांचे कार्य भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील, अशा भावना देखील व्यक्त केल्या.

## विरंगुळा प्रकल्पाचे आमदार शंकर जगताप यांचे हस्ते लोकार्पण

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी, दि. २३ जुलै २०२६- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासोबतच नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शहरात विविध विकासकामे करण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून नव्याने विकसित करण्यात आलेल्या सांगवी किवळे रस्त्यावर रक्षक चौक येथे सबवे बांधणे तसेच महात्मा ज्योतिबा फुले पुलाखाली तयार करण्यात आलेल्या बहुउद्देशीय विरंगुळा प्रकल्पाचे लोकार्पण आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले.

सांगवी येथील महात्मा फुले उड्डाणपूलाखालील झालेल्या कार्यक्रमास ह प्रभाग अध्यक्षा तृप्ती कांबळे ,शिक्षण समिती सभापती रविना आंघोळकर, नगरसदस्य ज्ञानेश्वर जगताप, शशिकांत कदम, शाम जगताप, नवनाथ जगताप, दिप्ती कांबळे,पल्लवी जगताप, शहर अभियंता मनोज सेठीथा,सह शहर अभियंता बापू गायकवाड,कार्यकारी अभियंता सुनिल पवार,उप अभियंता चंद्रकांत मोरे तसेच परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. सांगवी फाटा येथील महात्मा ज्योतिबा फुले पुलाखालील मोकळ्या जागेचा प्रभावी वापर करत बहुउद्देशीय विरंगुळा प्रकल्प विकसित करण्यात आला आहे. या प्रकल्पामध्ये नागरिकांसाठी आकर्षक सुशोभीकरण, फिरण्यासाठी मार्ग, बैठकीची व्यवस्था, व्यायामासाठी सुविधा, खुली जागा तसेच सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी उपयुक्त परिसर विकसित करण्यात आला आहे. पूर्वी दुर्लक्षित असलेल्या जागेचे लोकाभिमुख सार्वजनिक स्थळात रूपांतर झाल्यामुळे परिसराच्या सौंदर्यात भर पडली असून नागरिकांना दर्जेदार विरंगुळ्याचे केंद्र उपलब्ध झाले आहे.

## विशेष सखोल पुनरीक्षणासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय मदत कक्ष कार्यान्वित

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी, दि. २३ जुलै २०२६ : विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर)-२०२६ कार्यक्रमाच्या अनुषंगाने मतदारांना आवश्यक माहिती, मार्गदर्शन आणि तातडीचे सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समन्वयाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत विधानसभा मतदारसंघनिहाय मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. मतदारांच्या शंका, अडचणी आणि तक्रारींचे निराकरण करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाचा १९५० हा हेल्पलाईन क्रमांक देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे महानगरपालिका तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमासाठी मदत कक्ष स्थापन करण्यात आले असून, संबंधित विधानसभा मतदारसंघांसाठी स्वतंत्र संपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या माध्यमातून मतदारांना अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, मतदार यादीतील नोंदी तसेच इतर संबंधित बाबींमध्ये मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी राहुल शेडगे (९९२२५०१९७७), २०६ पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठी अतुल किर्वे (९८६०३१०८६६) आणि २०७ भोसरी विधानसभा मतदारसंघासाठी पंकज पवार (९८२२२३५४८०) यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील राखीव मदत कक्षासाठी दिलीप आंब्रे (८६९८८४८३२४) यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान मतदारांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी कोणत्याही अनधिकृत संदेशांवर किंवा अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत मदत कक्ष अथवा भारत निवडणूक आयोगाच्या १९५० हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून अचूक माहिती प्राप्त करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, मतदार यादीची अचूकता आणि पारदर्शकता ही सक्षम लोकशाहीची पूर्वअट आहे. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात प्रत्येक पात्र मतदाराला आवश्यक मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने विधानसभा मतदारसंघनिहाय मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत.

## आंद्रा जॅकवेलसाठी जागेला मंजुरी - आ. शंकर जगताप

**३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने मिळणार जागा, सबस्टेशन उभारण्यासह अतिरिक्त पाण्याचा मार्ग मोकळा**

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहराचा पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या आंद्रा धरण जॅकवेल प्रकल्पातील जागेचा अडथळा अखेर दूर झाला आहे. मौजे शिरे (ता. मावळ, जि. पुणे) येथील जलसंपदा विभागाची ०.९५५ हेक्टर जागा (९५ गुंठे) पिंपरी-चिंचवड महापालिकेला ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यास मंजुरी मिळाली आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत हा प्रश्न उपस्थित करण्यासह जलसंपदा विभाग, राज्य शासन आणि संबंधित सर्व स्तरांवर सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

दरम्यान जागेला मंजुरी मिळाल्यामुळे महापालिकेला आता जॅकवेलसह संबंधित कामांची निविदा प्रक्रिया पुढे नेता येणार आहे. मात्र, कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी भाडेपट्ट्याची रक्कम भरणे आणि जागा ताब्यात घेण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण करणे महापालिकेला बंधनकारक राहणार असून त्यानंतरच जॅकवेल, ॲप्रोच चॅनेल, पंप हाऊस, ॲप्रोच ब्रिज आणि सबस्टेशन उभारण्याच्या कामाला गती देता येणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती गरज लक्षात घेता आंद्रा धरणातून मंजूर पाणी थेट शहरापर्यंत आणण्यासाठी महापालिकेने प्रकल्प हाती घेतला आहे. त्यासाठी धरणाजवळ जॅकवेल, ॲप्रोच चॅनेल, पंप हाऊस, ॲप्रोच ब्रिज आणि सबस्टेशन उभारण्यात येणार आहे. मात्र, या कामासाठी आवश्यक जागा उपलब्ध नसल्याने निविदा प्रक्रिया आणि प्रत्यक्ष काम रखडले होते.

हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत आवाज उठविला. तसेच जलसंपदा विभागाचे मंत्री, वरिष्ठ अधिकारी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ आणि महापालिका प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांनंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने मौजे शिरे येथील गट क्रमांक ३८ मधील ०.९५५ हेक्टर जागा वार्षिक भाडेपट्ट्याने ३० वर्षांसाठी महापालिकेला देण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे.

या जागेचे सन २०२६-२७ च्या रेडीरेकनर दरानुसार सुमारे २ कोटी २२ लाख ५५ हजार ५०० रुपये मूल्यांकन करण्यात आले आहे. नियमानुसार भाडेपट्ट्याची रक्कम महापालिकेला एकरकमी भरावी लागणार आहे. संबंधित जागेची मालकी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडेच राहणार असून, पर्यावरणाचे संरक्षण आणि पिण्याचे पाणी दूषित होणार नाही याची जबाबदारी महापालिकेवर राहणार आहे.

## 'पीसीयूचे उपक्रम सक्षम नागरिक घडविण्यासाठी उपयोगी'

■ पिंपरी (दै. संध्या)

विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधारित शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक जबाबदारी, नैतिक मूल्य रुजविणे आवश्यक आहे. या त्रिसूत्रांमुळे त्यांचे जीवन समृद्ध होईल आणि ते व्यावसायिकदृष्ट्या आणखी सक्षम होतील. यासाठी पीसीयू येथे विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्या अंतर्गत एआयसीटीई च्या मान्यतेने जागतिक मानवी मूल्य या विषयावर प्राध्यापक विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे, ही कार्यशाळा प्राध्यापकांसह देशासाठी सक्षम नागरिक घडविण्यासाठी उपयोगी ठरेल असे मत पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे एआयसीटीई मान्यताप्राप्त प्राध्यापक विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. यशवंत पाटील, निरीक्षक पांडुरंग भिसे, सह समन्वयक डॉ. अनीता माने तसेच सहभागी विद्यार्थी, प्राध्यापक आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात ११६ नोंदणी प्राप्त झाल्या होत्या. ८५ हून अधिक प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या दृष्टीकोनाशी सुसंगत मूल्याधारित शिक्षण, आत्मअन्वेषण, सुसंवादी जीवनशैली आणि सर्वांगीण मानवी विकास याबाबत प्राध्यापकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. सहभागी प्राध्यापकांनी मानवी आकांक्षा, परस्पर संबंध, परस्पर आनंद, समृद्धी आणि अध्यापन पद्धती या विषयांवर संवादात्मक चर्चांमध्ये सहभाग घेतला. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, हर्षवर्धन पाटील, अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, डॉ. गिरीश देसाई उपस्थित होते.

## 'भारत नव-निर्माण चॅलेंज २०२६' मध्ये पीसीसीओईचे राष्ट्रीय विजेतेपद

**एआय स्मार्ट सेफ्टी हेल्मेट प्रकल्पाचा देशपातळीवर गौरव**


■ पिंपरी (दै. संध्या)




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) च्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) मधील स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी 'भारत नव-निर्माण चॅलेंज २०२६' या राष्ट्रीय स्पर्धेत अंतिम फेरीत प्रथम क्रमांक पटकावला. निकमार युनिव्हर्सिटी यांच्या सहकार्याने, एआयसीटीइ आणि अर्न्स्ट अँड यंग (ईवाय) यांच्या सहभागातून आयोजित केलेल्या या स्पर्धेत पीसीसीओई च्या विद्यार्थ्यांनी "एआय स्मार्ट सेफ्टी हेल्मेट" हा प्रकल्प सादर केला होता. या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातून एकूण ४५५ पेक्षा जास्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील संघांनी सहभाग घेतला होता. पीसीसीओई च्या विजेत्या संघात आदित्य आघाव, सिद्धेश देसाई आणि अर्शिया इनामदार यांचा समावेश होता. त्यांना डॉ. धीरजकुमार लाल, डॉ. विनय रंगारी, डॉ. मनीष नारखेडे आणि डॉ. राजेश फुरसुलेयांनी मार्गदर्शन केले. दिल्ली येथे झालेल्या बक्षीस वितरण समारंभात त्यांचा केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी एचसीसी, लार्सन अँड टुब्रो, टाटा प्रोजेक्ट्स, गॅमन इंडिया यांसह देशातील आघाडीच्या बांधकाम कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पीसीईटी ट्रस्ट कार्यालयात पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे यांच्या हस्ते विजेत्या संघाचे मार्गदर्शक स्थापत्य अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. अजय गायकवाड, डॉ. धीरजकुमार लाल, डॉ. विनय रंगारी, डॉ. मनीष नारखेडे आणि डॉ. राजेश फुरसुले यांचा सत्कार करण्यात आला. पीसीसीओईच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला "स्मार्ट सेफ्टी हेल्मेट अँड एआय सिस्टीम फॉर कन्स्ट्रक्शन प्रोग्रेस मॉनिटरिंग" हा अभिनव प्रकल्प विशेष ठरला. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), लायडार आणि कॉम्प्युटर व्हिजन या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने बांधकाम कामगारांची सुरक्षा वाढविणे आणि बांधकाम प्रगतीचे स्मार्ट पद्धतीने निरीक्षण करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश होता.यासाठी पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग रिसर्च फाउंडेशन (पीसीईआरएफ), पुणे यांनी आर्थिक सहाय्य व संशोधन अनुदान दिले होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### रक्तदान शिबिरांची नितांत गरज - भगवान मेदनकर

पुणे (दैनिक संध्या) : रक्ताचा तुटवडा भासू नये म्हणून रक्त संकलित करण्याकरता रक्तदान शिबिरांची नितांत गरज असल्याचे विचार उद्योजक भगवान मेदनकर यांनी व्यक्त केले. चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात मार्गदर्शन करताना मेदनकर बोलत होते. यावेळी चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी यांचा सन्मान करण्यात आला. चाकण ब्लड बँकेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात दीडशे रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यांचा यावेळी शाल, श्रीफळ, मानचिन्ह व प्रशस्तीपत्र आणि रेनकोट देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवान मेदनकर यावेळी म्हणाले, " रक्तदान शिबिरात सर्वांचा सहभाग असणे अत्यंत गरजेचे आहे. रक्ताचा एक थेंब माणसाचा जीव वाचू शकतो. अशा उपक्रमांची समाजाला गरज आहे." उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. धीरज वाळुंज यांनी स्वागत केले. संदेश जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.



### उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन.

पुणे (दैनिक संध्या) : रक्ताचा तुटवडा भासू नये म्हणून रक्त संकलित करण्याकरता रक्तदान शिबिरांची नितांत गरज असल्याचे विचार उद्योजक भगवान मेदनकर यांनी व्यक्त केले. चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात मार्गदर्शन करताना मेदनकर बोलत होते. यावेळी चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी यांचा सन्मान करण्यात आला. चाकण ब्लड बँकेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात दीडशे रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यांचा यावेळी शाल, श्रीफळ, मानचिन्ह व प्रशस्तीपत्र आणि रेनकोट देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवान मेदनकर यावेळी म्हणाले, " रक्तदान शिबिरात सर्वांचा सहभाग असणे अत्यंत गरजेचे आहे. रक्ताचा एक थेंब माणसाचा जीव वाचू शकतो. अशा उपक्रमांची समाजाला गरज आहे." उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. धीरज वाळुंज यांनी स्वागत केले. संदेश जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

कवठे येमाई : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिक व युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शेकडो तरुणांनी रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन शिरूरचे माजी आमदार पोपटरावजी गावडे यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाचे नियोजन जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे यांनी केले होते. रक्तदात्यांच्या सेवाभावाचा गौरव म्हणून प्रत्येक रक्तदात्यास हेल्मेट भेट देण्यात आले. तसेच भाग्यवान रक्तदात्यांसाठी ठेवलेल्या सोडतीत अनिल भंडारी व विलास खोमणे हे प्रत्येकी एका सायकलीचे मानकरी ठरले. यावेळी बोलताना जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे म्हणाले, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने काम केले आहे. स्वर्गीय अजितदादा पवार यांनी ही शेवटपर्यंत विकासाचीच भूमिका जपली. या दोन्ही नेत्यांचे विचार समाजहित, विकास आणि जनसेवेची प्रेरणा देणारे असून त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे."या रक्तदान शिबिरामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, सामाजिक बांधिलकी जपत युवकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून समाजाप्रती आपले कर्तव्य बजावल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



स्वर्गीय अजितदादा पवार यांनी ही शेवटपर्यंत विकासाचीच भूमिका जपली. या दोन्ही नेत्यांचे विचार समाजहित, विकास आणि जनसेवेची प्रेरणा देणारे असून त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे."या रक्तदान शिबिरामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, सामाजिक बांधिलकी जपत युवकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून समाजाप्रती आपले कर्तव्य बजावल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# आषाढ वारीत विठू माऊलींच्या नाम घोषात दंग झाली तरुणाई









सर्व फोटो : प्रणव थोरात मुंबई.

जेजुरी (दै. संध्या) : आषाढ वारी निमित्त राज्याच्या विविध भागातून लाखो वारकरी भाविक विठू माऊलींच्या दर्शनासाठी पंढरीकडे मार्गस्थ झाले आहेत. विठू माऊलींच्या भेटीची ओढ,मुखी पांडुरंगाचे नामस्मरण करत या सोहळ्यात हजारो तरुण सहभागी झाले आहेत.

वाखरी येथे उन पाऊस, चिखल, दगड धोंडे यांची पर्वा न करता विठ्ठल नामात दंग झालेल्या तरुणाईचे वारीतील क्षण आपल्या कॅमेरात प्रणव थोरात यांनी टिपले आहेत.

व्यवस्थापक मा. श्री. धवल शहा (वाघोलीकर), व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच स्कूलच्या प्राचार्या प्रणाली वडेर यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## रक्तदान शिबिरांची नितांत गरज

**बारामती (दै. संध्या)**

रक्ताचा तुटवडा भासू नये म्हणून रक्त संकलित करण्याकरता रक्तदान शिबिरांची नितांत गरज असल्याचे विचार उद्योजक भगवान मेदनकर यांनी व्यक्त केले.

चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात मार्गदर्शन करताना मेदनकर बोलत होते. यावेळी उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी यांचा सन्मान करण्यात आला. चाकण ब्लड बँकेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात दीडशे रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यांचा यावेळी शाल, श्रीफळ, मानचिन्ह प्रशस्तीपत्र आणि रेनकोट देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चाकणला उपनगराध्यक्षा नायकवाडी यांचा सन्मान

**चाकण (दै. संध्या)**

चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी जयश्री विशाल नायकवाडी यांची बहुमताने निवड झाल्याबद्दल चाकण येथे त्यांचा सन्मान करण्यात आला.

भाजपच्या जिल्हा सरचिटणीस प्रिया पवार व उद्योजक भगवान मेदनकर यांच्या हस्ते जयश्री नायकवाडी यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष शांताराम भोसले, शामराव पुसदकर, उद्योजक विशाल नायकवाडी, संदेश जाधव, धिरज वाळुंज, प्रविण करपे, श्रीकांत परदेशी, प्रशांत शेवकरी, किशोर भुजबळ, नरेंद्र वाळुंज, नसीम पठाण, संतोष ओतारी, किरण वरखडे, कैलास सुर्यवंशी, ज्ञानेश्वर बढे, अर्जुन बोऱ्हाडे, मंगेश देसाई, आदींसह मान्यवर, संख्येने उपस्थित होते.



## ‘अनेकान्त’ च्या विद्यार्थ्यांचा दुहेरी विजय

**बारामती (दै. संध्या)**

स्पष्ट विचार, उत्तम शब्दफेक आणि विलक्षण आत्मविश्वासाच्या बळावर अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूल, बारामती (AEMS) च्या विद्यार्थ्यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे पार पडलेल्या आंतरशाळा लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा नाव लौकिक वाढविला.

स्पर्धेतील अटीतटीच्या सामन्यात आपल्या बाल वक्त्यांनी भाषेवरील प्रभुत्व आणि उत्कृष्ट संवादकौशल्याच्या जोरावर उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता ५ वी ते ७ वी (संस्कृत) गटात इयत्ता ७ वी ची विद्यार्थिनी कु. शताक्षी सचिन सोन्ना हीने प्रथम क्रमांक पटकाविला. तिच्या अचूक उच्चार आणि संयमामुळे परीक्षकांना व रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. त्याचबरोबर इयत्ता ५ वी ते ७ वी (इंग्रजी) गटात इयत्ता ७ वी ची विद्यार्थिनी कु. अनन्या गुरुप्रसाद कामत हीने प्रथम क्रमांक प्राप्त केला. अनन्याने मोठ्या व्यासपीठावर आपल्या जबरदस्त सार्वजनिक भाषण कौशल्याचे, स्पष्ट उच्चारांचे आणि अफाट आत्मविश्वासाचे दर्शन घडवत दमदार सादरीकरण केले. वक्तृत्व म्हणजे केवळ बोलणे नव्हे; तर श्रोत्यांशी जोडले जाणे, त्यांना प्रेरणा देणे आणि विचारांची देवाणघेवाण करणे होय. शताक्षी आणि अनन्या यांचे हे यश त्यांच्या अखंड मेहनतीचे आणि मार्गदर्शक शिक्षकांनी रुजवलेल्या उच्च भाषिक मूल्यांचे प्रतीक आहे.

या दैदिप्यमान विजयाबद्दल दोन्ही गुणी विजेत्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. जवाहर शहा (वाघोलीकर), सचिव मा. श्री. मिलिंद शहा (वाघोलीकर), स्कूलचे चेअरमन



## नारायण करपे यांचा आदर्श घ्या : ललिता दहितुले

**चाकण (दै. संध्या)**

विद्यार्थी घडविण्यात अत्यंत मोलाची कामगिरी आणि विशेष योगदान देणारे आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते नारायण करपे यांचा इतरांनी आदर्श घ्यावा असे मत पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषदेच्या येथील प्राथमिक शाळेत शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता तपासणी दरम्यान दहितुले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. दहितुले यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांची प्रगती अत्यंत समाधानकारक असल्याबद्दल त्यांनी आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते नारायण करपे व मुख्याध्यापिका हेमलता देशमुख यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले, विस्तार अधिकारी जीवन कोकणे, केंद्रप्रमुख सुनील रायकर, मुख्याध्यापिका हेमलता देशमुख, प्रभाकर शिंदे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दहितुले पुढे म्हणाल्या," पूर्वीचे आणि आताचे शिक्षण यात खूप बदल झाला आहे. सध्याच्या युगात तंत्रज्ञानाला अत्यंत महत्त्व असले तरी विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात आपला निभाव लागण्यासाठी आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मोबाईलचा अतिवापर टाळणे अपेक्षित वाटते. विद्यार्थ्यांनी विशेष करून पुस्तकं अन् झाडांशी मैत्री केली पाहिजे. आपल्याला जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर लहानपणापासूनच ध्येय निश्चित करून विविध प्रकारची पुस्तके वाचून ज्ञानात भर पडण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे."

# चाकणमध्ये वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण

### खेड तालुक्यातील प्रवास नको रे बाबा.. ठोस उपाययोजना करण्याची मागणी

**चाकण (दै. संध्या)**


चाकण मधील परिस्थिती दिवसेंदिवस अत्यंत गंभीर होत चालली असून, वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक अक्षरश: हैराण झाले आहेत. चाकण हे आता शहर राहिले नसून एक आंतरराष्ट्रीय औद्योगिक केंद्र झाले आहे. त्या मानाने चाकण परिसरातील पायाभूत सुविधा आणि वाहतूक नियोजन अत्यंत तोकडे पडत आहे.

चाकण मधील वाहतूक कोंडी ही केवळ गैरसोय नसून ती आता नरकयातना झाली आहे. चाकण मध्ये रस्त्याच्या दुतर्फा असलेली अनधिकृत दुकाने आणि टपऱ्यांमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. नियोजनशून्य पार्किंग बनले आहे. अवजड वाहने, ट्रक, कंटेनर रस्त्याच्या कडेलाच उभी केली जात आहेत. यामुळे खऱ्या अर्थाने शहरात वाहतुकीला अडथळा होतो.

अरुंद रस्ते आणि उड्डाणपुल असून नसल्यासारखे आहेत. वाढत्या वाहनांच्या तुलनेत रस्त्यांचे रुंदीकरणही रखडलेले आहे. विरुद्ध दिशेने येणारी वाहने आणि सिग्नल यंत्रणेचा अभाव आहे.

प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत.

चाकण नगरपरिषदेने पोलिसांच्या मदतीने जुन्या पुणे नाशिक रस्त्यावरील चाकण हद्दीतील अतिक्रमणे कायमस्वरूपी हटविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. नो पार्किंग झोनची कडक अंमलबजावणी करून चाकण मधील मुख्य चौकात आणि रस्त्यांवर उभ्या राहणाऱ्या जड वाहनांवर जप्तीची कारवाई होणे अपेक्षित आहे. नगरपरिषदेने स्वतःचे ट्रॅफिक वॉर्डन्स नेमून पोलिसांना मदत करणे आवश्यक आहे. औद्योगिक वसाहतीत ट्रकसाठी शहराबाहेर हक्काच्या पार्किंगची सोय करण्याची गरज आहे.



दैनिक **संध्या** नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक




## थोडक्यात पण महत्वाचे




### २३ वर्ष मुदतीचे १६०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई, दि. २३: महाराष्ट्र शासनाच्या २३ वर्ष मुदतीच्या १६०० कोटींच्या '८.०७ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०४९'च्या (८ एप्रिल २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणूकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. २८ जुलै २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बिडस् २८ जुलै २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बिडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २९ जुलै २०२६ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

### महाराष्ट्र शासनाचे २४०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या १३ वर्ष मुदतीच्या २४०० कोटींच्या '७.९१ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०३९'च्या (८ एप्रिल २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणूकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. २८ जुलै २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बिडस् २८ जुलै २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बिडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २९ जुलै २०२६ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील. कर्जरोख्याचा कालावधी १३ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ८ एप्रिल २०२६ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड ८ एप्रिल २०३९ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा ७.९१ टक्के दरसाल दर शेकडा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी ८ ऑक्टोबर आणि ८ एप्रिल रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

# 'भारत टॅक्सी'मुळे प्रवासी आणि चालकांसाठी प्रवासाचा नवा अध्याय

**आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रांगणात 'भारत टॅक्सी' सेवेचा शुभारंभ**

■ मुंबई (दै. संध्या)

सहकाराची नवी क्रांती 'भारत टॅक्सी'मुळे प्रवासी आणि चालकांसाठी प्रवासाचा नवा अध्याय असून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली देशात सुरू झालेली ही सहकार क्षेत्रातील भारत टॅक्सी मॉडेल संकल्पना प्रवाशांना रास्त भाड्यात सुरक्षित प्रवास देणारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रांगणात आज केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष सोहळ्यात 'भारत टॅक्सी' (BHARAT TAXI) सेवेचा अधिकृत शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

या सेवा शुभारंभ सोहळ्यास केंद्रीय राज्यमंत्री (सहकार आणि नागरी विमान वाहतूक, भारत सरकार) मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार मंदाताई म्हात्रे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य दिपक तावरे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर, ठाणे महानगर पालिकेचे आयुक्त सौरभ राव, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभागाचे आदिनाथ दगडे, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, लोकनेते दि. बा. पाटील स्थानिक प्रकल्पग्रस्त परिवहन सहाकारी संस्थेचे सदस्य रामशेठ ठाकूर, सहकार टॅक्सी को-ऑप. लि. चे चेअरमन डॉ. जयेन मेहता, रुपेश धुमाळे आदि मान्यवर उपस्थित होते.




नवी मुंबई विमानतळावर आगमन होताच मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करुन मानवंदना दिली.

एकाच मोबाईल अॅपद्वारे कार, ऑटो-रिक्षा आणि बाईक टॅक्सी सेवा उपलब्ध : याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ओला आणि उबरसारख्या खासगी अॅग्रीगेटर्सनी आजवर वाहतूक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. मात्र, सण-उत्सव किंवा पावसाच्या काळात प्रचंड भाडेवाढ (Dynamic Pricing) करून सर्वसामान्य प्रवाशांची होणारी लूट आणि चालकांवर लादले जाणारे अवाजवी कमिशन या दोन्ही गोष्टींमुळे प्रवासी व चालक दोन्ही अडचणीत येत होते. या पार्श्वभूमीवर भारत टॅक्सीच्या माध्यमातून सहकार क्षेत्राच्या ताकदीवर एक अत्यंत पारदर्शक, सुरक्षित आणि स्वस्त पर्याय उभा राहिला आहे.

नवी मुंबई विमानतळ परिसरातील स्थानिक आणि प्रकल्पबाधितांच्या अनुषंगाने बोलताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, या नव्या वाहतूक व्यवस्थेमुळे या भागातील भूमिपुत्रांना आणि तरुणांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. डिजिटल स्वाक्षरीसह राज्य सरकारने अॅग्रीगेटर धोरणाची चौकट आखून दिली असून, संपूर्ण आर्थिक व्यवहारांवर सहकार विभागाचे नियंत्रण असणार आहे. पहिल्या टप्प्यात ६०० टॅक्सींचे अनावरण करण्यात आले असून आगामी काळात १००० पेक्षा जास्त टॅक्सींचा टप्पा गाठण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

## 'राजधानीत मराठी भाषा – संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी शासन कटिबद्ध'

■ मुंबई (दै. संध्या)

मराठी भाषेचा जागतिक विस्तार करण्यासह देशाच्या राजधानीत मराठी भाषा, संस्कृती व परंपरेचे संवर्धन करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. यासाठी कार्य करणाऱ्या दिल्लीतील सर्व मराठी मंडळांच्या पाठीशी महाराष्ट्र शासन खंबीरपणे उभे राहिल, अशी ग्वाही मराठी भाषा व उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली.

येथील महाराष्ट्र सदन येथे मंत्री सामंत यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली व परिसरातील विविध मराठी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला राज्यसभा खासदार रामराव वडकुते, कर्नाटकचे आमदार डॉ. मारोतीराव मुळे, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सरहद्द संस्थेचे अध्यक्ष संजय नहार आणि समन्वयक लेशपाल जवळगे यांसह दिल्ली व परिसरातील मराठी मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत दिल्लीतील मराठी मंडळींचे संघटन, सार्वजनिक गणेशोत्सवाचे नियोजन, मराठी भाषा व संस्कृतीचे जतन, तसेच मराठी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित प्रतिनिधींनी दिल्लीमध्ये सुमारे साडेचार लाख मराठी भाषिक वास्तव्यास असून त्यांनी राजधानीत आपले स्वतंत्र सांस्कृतिक अस्तित्व निर्माण केले असल्याचे सांगितले. मराठी भाषा व संस्कृतीच्या संवर्धनासाठी कार्यरत संस्थांना महाराष्ट्र शासनाकडून आर्थिक व संस्थात्मक पाठबळ मिळावे, अशी मागणी त्यांनी मंत्री सामंत यांच्याकडे केली.

यावर सकारात्मक प्रतिसाद देताना मंत्री सामंत म्हणाले की, मराठी भाषा विभाग हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून जागतिक स्तरावर मराठीचा विस्तार करण्यासाठी कार्यरत आहे. परदेशात ७५ आंतरराष्ट्रीय मंच आणि देशात ७५ बृहन्महाराष्ट्र मंडळांचे जाळे उभारण्याचे काम सुरू असून, कर्नाटक सीमाभागातील मराठी ग्रंथालयांसाठी दोन कोटी रुपयांचे अनुदान देण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

## मुबलक प्रमाणात बियाणे व खते उपलब्ध करून द्यावे

**सूचना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ**

■ ना शिक(दै. संध्या)

शेतकऱ्यांची खरिपाची कामे वेगाने सुरू झाली आहे. शेतकऱ्यांना पेरणीसाठी आवश्यक बियाणे व खते मुबलक प्रमाणात उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्या.

येवला येथील संपर्क कार्यालयात आयोजित विविध विभागांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी येवला उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे, तहसीलदार आबा महाजन, नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुमेरसिंह पाकळ, गटविकास अधिकारी संदीप वायाळ, महाराष्ट्र जल जीवन मिशन, सिन्नर उपअभियंता श्रद्धा मोरे, तालुका कृषी अधिकारी शुभम बेरड यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.



मंत्री छगन भुजबळ म्हणाले, खरिप हंगामात विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांना बियाणे रास्त दराने विक्री होईल तसेच खताचा बफर स्टॉक करून ठेवावा आणि खताची लिंकिंग होणार नाही याबाबत काटेकोर दक्षता घेण्यात यावी.

तालुक्यात पाऊस सुरू झाला असून पाणी टंचाईच्या दृष्टीने आवश्यक त्याठिकाणी पाण्याचे टँकर सुरू ठेवावेत. येवला, निफाड व लासलगाव तालुक्यातील पीक कर्ज वाटपाचे लक्षांक पूर्ण करावे. मागणीनुसार पात्र शेतकऱ्यांना पीक कर्ज द्यावे, अशा सूचना मंत्री भुजबळ यांनी दिल्या.

जल जीवन मिशन कार्यक्रमअंतर्गत पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेताना मंत्री भुजबळ म्हणाले, येवला ३८ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील समाविष्ट गावांची वीजबिल दरवाढीसाठी ग्रामसेवकांची बैठक घेऊन सूचित करावे. विंचूर लासलगावसह १६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा सुधारीत योजनेतील कामांना गती देऊन कालवा गळतीची कामे पाऊस उघडल्यानंतर तातडीने पूर्ण करावीत. मुख्यमंत्री बळीराजा पाणंद योजनेत प्राप्त निधीनुसार आवश्यक कामांना प्राधान्य द्यावे. लासलगाव-विंचूर रस्ता काँक्रीटीकरण व चौपदरीकरण कामे, भरवस फाटा ते कोपरगाव रस्ता, पिंपळस ते येवला चौपदरी काँक्रीट रोड इत्यादी कामे सुरू करण्यात यावे. लासलगाव विंचूर चौपदरी सह खेडलेझुंगे काँक्रीट रोडची कामे गुणवत्तापूर्ण होतील यासाठी दक्ष राहावे. जल जीवन मिशन योजनेतील उर्वरित कामे पूर्ण करावीत.

## ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार

■ ना शिक(दै. संध्या)

अंदरसुल येथे उभारण्यात आलेल्या नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रामुळे नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा वेळेत उपलब्ध होवून ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम होईल, असे प्रतिपादन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

अंदरसूल, ता. येवला येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंदरसूल मुख्य इमारतीचे उद्घाटन मंत्री भुजबळ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, तहसीलदार आबा महाजन, गटविकास अधिकारी संदीप वायाळ, वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री पवार, डॉ. सचिन वैद्य, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद तारू यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, आशासेविका व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.



मंत्री भुजबळ म्हणाले, या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात सुमारे 46 हजार लोकसंख्या असून केंद्रामार्फत उत्कृष्ट आरोग्य सेवा दिली जात आहे. स्वच्छता, सुयोग्य व्यवस्थापन व दर्जेदार सेवेमुळे या केंद्राला तीन वेळा 'कायाकल्प' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. येथे दररोज ८० हून अधिक बाह्यरुग्णांवर उपचार केले जातात, तर दरमहा सुमारे दीड हजारांहून अधिक रुग्ण ओपीडीचा लाभ घेतात. याशिवाय सुरक्षित प्रसूती सेवा, माता- बाल आरोग्य, लसीकरण, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, आपत्कालीन सेवा आदी विविध सुविधा प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. केंद्राला मिळालेला सन्मान हा केवळ इमारतीचा नसून येथे कार्यरत डॉक्टर, परिचारिका व सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समर्पित सेवेमुळे मिळाल्याचे सांगत मंत्री भुजबळ यांनी त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. "जनसेवा हीच ईश्वरसेवा" या भावनेतून आरोग्य कर्मचारी नागरिकांची सेवा करत असून त्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

## महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्यासाठी मोठी झेप

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याच्या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टाला गती देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या थेट परकीय गुंतवणूक, अनिवासी भारतीय व राजशिष्टाचार विभाग आणि जैन चार्टर्ड अकाउंटंट्स फेडरेशन (जेसीएएफ) यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या कराराच्या माध्यमातून राज्यात थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित करणे, भांडवल उभारणीला चालना देणे, ज्ञानाची देवाणघेवाण वाढविणे तसेच जागतिक गुंतवणूकदारांशी संपर्क अधिक मजबूत करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील उद्योग, पायाभूत सुविधा आणि विविध विकास क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे.

करारानुसार जैन चार्टर्ड अकाउंटंट्स फेडरेशन आपल्या जागतिक संस्थात्मक, कॉर्पोरेट, अनिवासी भारतीय, आर्थिक व शैक्षणिक नेटवर्कच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावणार आहे. तसेच जागतिक गुंतवणूकदारांना भारतातील कररचना, फेमा, कंपनी कायदे आणि अन्य कायदेशीर बाबींविषयी तांत्रिक मार्गदर्शन व सल्लागार सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

याबरोबरच महाराष्ट्र शासन आणि जेसीएएफ यांच्या संयुक्त विद्यमाने देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर गुंतवणूकदार गोलमेज परिषदा, कार्यशाळा आणि जागतिक गुंतवणूकदार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्य शासनाचा थेट परकीय गुंतवणूक विभाग जेसीएएफमार्फत येणाऱ्या गुंतवणूकदारांना आवश्यक धोरणात्मक व प्रशासकीय सहकार्य उपलब्ध करून देणार आहे.

# नवी दिल्लीतील 'मऱ्हाटी एम्पोरियम'चा कायापालट करणार : मंत्री उदय सामंत

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

येथील महाराष्ट्राच्या मऱ्हाटी एम्पोरियमचा सर्वसमावेशक विकास करून तेथे महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती व परंपरेचे प्रतिबिंब टिपणारे भव्य व आकर्षक दालन उभारण्यात येणार असल्याचे राज्याचे उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी सांगितले.

मंत्री सामंत यांनी नवी दिल्लीतील महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लिमिटेडच्या अखत्यारीत असलेल्या मऱ्हाटी एम्पोरियमला सदिच्छा भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली आणि अधिकाऱ्यांसोबत सविस्तर आढावा बैठक घेतली.

यावेळी मार्गदर्शन करतांना मंत्री सामंत म्हणाले, नवी दिल्ली हे देशाचे केंद्रस्थान असून येथे जगभरातून पर्यटक आणि उद्योजक येतात. आपल्या महाराष्ट्रातील ग्रामीण कारागीर, महिला बचत गट आणि स्थानिक उद्योजकांच्या हाताला काम मिळून त्यांच्या कलागुणांना 'ग्लोबल प्लॅटफॉर्म' मिळणे आवश्यक आहे. या नूतनीकरणामुळे महाराष्ट्राची उत्पादने दिल्लीच्या मुख्य बाजारपेठेत आपले वेगळे स्थान निर्माण करतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

एम्पोरियमची पुनर्रचना करताना ते केवळ विक्री केंद्र न राहता, महाराष्ट्राच्या समृद्ध वारशाचे दर्शन घडवणारे 'अनुभूती केंद्र' म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करावा. तसेच या दालनाच्या माध्यमातून जगप्रसिद्ध पैठणी व हातमाग, कोल्हापुरी चप्पल, वारली पेंटिंग्स, हस्तकलेच्या वस्तू आणि महाराष्ट्राचे स्थानिक खाद्यपदार्थ (गृहउद्योग) एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

मंत्री सामंत यांनी दिल्लीतील काश्मीर, गुजरात बिहार या एम्पोरियम्सना भेट देऊन डिझाइन आणि विपणन पद्धतींबाबत माहिती जाणून घेतली. यावेळी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लिमिटेडचे महाव्यवस्थापक संगीता वराडे, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, कंपनी सेक्रेटरी अक्षय पाठक यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



### 'ग्लोबल प्लॅटफॉर्म' मिळणे आवश्यक

आपल्या महाराष्ट्रातील ग्रामीण कारागीर, महिला बचत गट आणि स्थानिक उद्योजकांच्या हाताला काम मिळून त्यांच्या कलागुणांना 'ग्लोबल प्लॅटफॉर्म' मिळणे आवश्यक आहे. या नूतनीकरणामुळे महाराष्ट्राची उत्पादने दिल्लीच्या मुख्य बाजारपेठेत आपले वेगळे स्थान निर्माण करतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. एम्पोरियमची पुनर्रचना करताना ते केवळ विक्री केंद्र न राहता, महाराष्ट्राच्या समृद्ध वारशाचे दर्शन घडवणारे 'अनुभूती केंद्र' म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करावा. तसेच या दालनाच्या माध्यमातून जगप्रसिद्ध पैठणी व हातमाग, कोल्हापुरी चप्पल, वारली पेंटिंग्स, हस्तकलेच्या वस्तू आणि महाराष्ट्राचे स्थानिक खाद्यपदार्थ एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे



पुरंदर (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा.डॉ.दिगंबर दुर्गाडे यांची महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनच्या (MSCBA) उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. सहकार क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव,अभ्यासपूर्ण नेतृत्वाची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली असून,त्यांच्या निवडीचे सहकार क्षेत्रासह राजकीय आणि सामाजिक स्तरावर स्वागत करण्यात येत आहे. प्रा.डॉ.दिगंबर दुर्गाडे हे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असून,सहकार क्षेत्रात त्यांनी दीर्घकाळ विविध पदांवर काम केले आहे.पुणे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी त्यांची २०२२ मध्ये निवड झाली होती.राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाचा त्यांच्यावर असलेला विश्वास आणि सहकार क्षेत्रातील अनुभवामुळे त्यांना ही जबाबदारी देण्यात आली होती. सहकार क्षेत्राबरोबरच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. प्रा. डॉ.दिगंबर दुर्गाडे यांच्या या निवडीबद्दल विविध सहकारी संस्था,राजकीय नेते,पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### अभाविपच्या आंदोलनाला यश; प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य

बारामती (दैनिक संध्या) : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद,बारामती जिल्ह्याच्या वतीने फ्लोरेट कॉलेज ऑफ इंटिरिअर अँड फॅशन डिझाइनच्या कथित अनागोंदी व निकृष्ट कारभाराविरोधात आज आंदोलन करण्यात आले. गेल्या दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक समस्यांबाबत अभाविपच्या वतीने कॉलेज प्रशासनाला निवेदने देऊन वारंवार पाठपुरावा करण्यात येत होता.मात्र, प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला. परीक्षेचे वेळापत्रक,परीक्षा निकालातील त्रुटी,कॉलेज फीवर आकारण्यात येणारी अतिरिक्त पेनल्टी फी,पुनर्परीक्षा तसेच विद्यार्थ्यांच्या इतर विविध शैक्षणिक समस्यांबाबत हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनानंतर कॉलेज प्रशासनाने अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सर्व मागण्या मान्य केल्या. विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेली अतिरिक्त फी परत करण्यात आली असून, भविष्यात अशा प्रकारचा कोणताही गैरव्यवहार किंवा विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही, असे आश्वासन कॉलेज प्रशासनाने दिले आहे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सदैव संघर्षशील राहील. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेविरोधात अभाविप लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करेल,असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### देशातील वातावरण अस्थिर करण्याचा प्रयत्न चिंताजनक : डॉ. हुलगेश चलवादी

पुणे (दैनिक संध्या) : केंद्र सरकारने नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणात अत्यंत गांभीर्याने कारवाई करत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या दोषी आणि जबाबदार व्यक्तींना अटक करून कारागृहात पाठवले आहे. त्यामुळे या संवेदनशील विषयावर राजकारण करणे योग्य नसून, दोषींना कठोर शिक्षा मिळणे हेच सर्वाधिक महत्त्वाचे आहे, अशी भूमिका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी मांडली आहे. राजधानीतील जंतर-मंतरवर तसेच देशभरातील विविध राज्यात सुरू असलेल्या आंदोलनाचा गैरफायदा घेत देशातील वातावरण अस्थिर करण्याचा प्रयत्न चिंताजनक असल्याचे देखील डॉ.चलवादी म्हणाले. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे राष्ट्रीय अध्यक्ष मा. रामदास आठवले यांनी मांडलेल्या भूमिकेची माहिती देताना डॉ.चलवादी म्हणाले की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला तर्कशीलता आणि बंधुत्वाची शिकवण दिली आहे. व्यंग किंवा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपयोग समाजप्रबोधनासाठी व्हावा, द्वेष पसरवण्यासाठी किंवा समाजात तेढ निर्माण करण्यासाठी नव्हे. डॉ. चलवादी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेपरफुटी प्रकरणातील सुनावणी फास्ट-ट्रॅक न्यायालयात करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह असून, त्यातून केंद्र सरकारची संवेदनशील आणि तत्पर भूमिका स्पष्ट होते. प्रशासन आणि पोलीस स्तरावरील योग्य मागण्यांवर कार्यवाही सुरू असताना, या विषयाचे केवळ राजकारण करणे देशहिताचे नाही. विरोधी पक्ष या आंदोलनाच्या माध्यमातून राजकीय लाभ मिळविण्याचा प्रयत्न करत असल्याची भूमिका मा.आठवले साहेबांनी मांडली आहे. उपोषणकर्ते सोनम वांगचुक यांनी त्यांचे उपोषण मागे घेतले असल्याने आंदोलनकर्त्यांनी आता न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवत आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन डॉ.चलवादी यांनी केले. न्यायप्रक्रियेला सहकार्य करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. केवळ राजीनाम्याची मागणी करण्यापेक्षा दोषींना कठोर शिक्षा होणे अधिक महत्त्वाचे आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आणि नीट पेपरफुटी प्रकरणावर सभागृहात सविस्तर चर्चा होण्यासाठी सरकारला सहकार्य करावे.

# स्वच्छतेतून लोकसेवेचा संदेश; कृषि उद्योग मूल शिक्षण संस्थेचा स्तुत्य उपक्रम

बारामती (दै. संध्या)



आदरणीय अजितदादा पवार साहेब यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांना केवळ शब्दांनी नव्हे, तर कृतीतून अभिवादन करण्याच्या उद्देशाने कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था, काऱ्हाटी यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती परिसरात भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले. संस्थेच्या विविध विभागांतील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

मागील वर्षी आदरणीय अजितदादा पवार यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्त, त्यांचा वाढदिवस केवळ वर्षातून एकदाच साजरा न करता प्रत्येक महिन्याच्या २२ तारखेला समाजोपयोगी उपक्रमातून साजरा करण्याचा संकल्प संस्थेने केला होता. त्यानुसार दादांनी उभारलेल्या विविध विकासकामांपैकी दर महिन्याला एका ठिकाणी स्वच्छता करून समाजात स्वच्छतेचा संदेश देण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला.

या उपक्रमाची सुरुवात २२ जुलै २०२५ रोजी सुपा ग्रामीण रुग्णालय, सुपा येथून झाली होती. डिसेंबर २०२५ अखेर बारामती तालुक्यातील विविध ४२ ठिकाणी स्वच्छता अभियान यशस्वीरीत्या राबविण्यात आले. या उपक्रमाचे कौतुक स्वतः आदरणीय अजितदादा पवार यांनी डिसेंबर महिन्यात केले होते. मात्र २८ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या दुःखद निधनानंतर, यंदाची २२ जुलै ही तारीख जड अंतःकरणाने त्यांच्या जयंतीच्या रूपाने साजरी करण्याची वेळ आली.

दादांनी आयुष्यभर जोपासलेली लोकसेवा, शिस्त, वेळेचे नियोजन आणि स्वच्छतेची संस्कृती समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी कल्याणी कॉर्नर ते रसाळ कॉर्नर या परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम राबविली. दादा रोज सकाळी ६ वाजता कामाची सुरुवात करत असत, त्याच कार्यशैलीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सर्व सहभागी सकाळी ६ वाजताच अभियानासाठी उपस्थित झाले. परिसरातील प्लास्टिक, कचरा व इतर टाकाऊ वस्तू गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

या उपक्रमातून स्वच्छता हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून सामाजिक जबाबदारी असल्याचा संदेश देण्यात आला. दादांच्या कार्याचा वारसा जपत समाजहितासाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

हा उपक्रम महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा कृषि उद्योग मूल शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा आदरणीय सुनेत्रा वहिनीसाहेब पवार, राज्यसभा खासदार व संस्थेचे विश्वस्त श्री. पार्थदादा पवार, संस्थेचे उपाध्यक्ष आदरणीय दशरथदादा धुमाळ, सचिव प्रफुल्ल तावरे, खजिनदार सुभाष सोमाणी तसेच सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

याबाबत माहिती देताना संस्थेचे कार्यकारी अधिकारी श्री. विकास निर्मळ म्हणाले, "दादा आज आपल्यात नसले तरी त्यांचे विचार आणि कार्यपद्धती आजही आमच्यासाठी प्रेरणादायी आहेत. स्वच्छतेतून समाजसेवा आणि समाजसेवेतून राष्ट्रसेवा हा त्यांचा संदेश कृतीतून जिवंत ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे. ही मोहीम त्यांच्या पवित्र स्मृतींना वाहिलेली कृतीशील आदरांजली आहे."

यावेळी संस्थेच्या सर्व विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वच्छतेचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## नारायणगाव येथे कलाकार मानधन ऑनलाइन अर्ज भरणे शिबिर

नारायणगाव (दै. संध्या)

राज्य पुरस्कार प्राप्त हलगी सम्राट केरबा पाटील संस्थेच्यावतीने मुक्ताई मंदिर कार्यालय नारायणगाव येथे मंगळवार दिनांक 28 जुलै 2026 रोजी सकाळी 11 वा. जुन्नर, आंबेगाव ,खेड, शिरूर,पारनेर तालुक्यातील जेष्ठ कलावंत व साहित्यिक यांना ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महाराष्ट्र शासन समाजभूषण पुरस्कार्थी प्रा. काशिनाथ आल्हाट यांनी ही माहिती दिली. राज्य पुरस्कार प्राप्त हलगी सम्राट केरबा पाटील ही संस्था लोककलावंतांसाठी गेले 18 ते 20 वर्ष विविध उपक्रम घेऊन समाजहिताचे उपक्रम राबवत आहे. त्यापैकी लोककलावंतांच्या हिताचा आणि उदरनिर्वाचा उपक्रम म्हणजे कलाकार मानधन.

## स्थानिकांच्या सहकार्यामुळे SIR नोंदणी प्रक्रिया सुरळीत

राजगुरुनगर (दै. संध्या)



भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारयादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) अभियान सुरू असून, या मोहिमेअंतर्गत प्रत्येक मतदाराची माहिती अचूकपणे अद्ययावत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, मतदार शोधण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बी.एल.ओ.) यांना मोठी कसरत करावी लागत आहे.

अनेक मतदारांनी राहण्याचा पत्ता बदललेला असून काहीजण नोकरी, शिक्षण किंवा व्यवसायानिमित्त इतर ठिकाणी वास्तव्यास असल्याने मतदाराची माहिती मिळण्यास बी.एल.ओ.ना एकाच ठिकाणी वारंवार भेट द्यावी लागत आहे. त्यामुळे माहिती संकलनाचे काम वेळखाऊ ठरत आहे.मतदारयादी अचूक व अद्ययावत करण्यासाठी शहरातील,सामाजिक कार्यकर्ते,लोक प्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिक बी.एल.ओ यांना मतदार शोधण्यास आवश्यक सहकार्य करीत असल्याचे दिसत आहे.

मतदार यादीत पारदर्शकता आणण्यासाठी निवडणूक आयोगाने मार्च 2026 पासून S.I.R (विशेष सखोल पुनरीक्षण) महाराष्ट्र २०२६ ही महत्त्वाची प्रक्रिया सुरू केली आहे. पहिल्या टप्प्यात निवडणुक आयोगाने दुबार मतदार नावाचा मॅपिंग द्वारे शोधमोहीम राबवून आता मतदारांकडून एन्युमरेशन फॉर्म भरून घेण्यासाठी मोहीम सुरू केली आहे.

## बारामती शहर पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल

### प्रलंबित बिले व ठेव रक्कम मंजूर करून देण्यासाठी ₹६ लाख लाचेची मागणी; तडजोडीअंती ₹४ लाख स्वीकारताना लोकसेवक रंगेहात जेरबंद

बारामती (दै. संध्या)

बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. २८८/२०२६ हा भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ (सुधारित) चे कलम ७ अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथील पोलीस निरीक्षक श्री. संतोष बुधा पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नोंदविण्यात आला असून पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू आहे. या गुन्ह्यातील आरोपी अनिल तुकाराम बनकर (वय ५१ वर्षे) हे बारामती एमआयडीसी डेपो येथे वाहतूक नियंत्रक म्हणून कार्यरत असून ते स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबईचे संचालक देखील आहेत. तक्रारदार हे फर्निचर व्यवसायिक असून त्यांच्या जित वुडन फर्निचर या फर्ममार्फत स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबईच्या बारामती शाखेच्या नवीन इमारतीतील फर्निचरचे काम संचालक मंडळाच्या ठरावानुसार करण्यात आले होते. या कामाची एकूण किंमत ₹४८,६०,४५५/- होती. त्यापैकी ₹४०,००,०००/- रक्कम तक्रारदारास प्राप्त झाली होती; मात्र ₹८,६०,४५५/- इतके फर्निचर कामाचे बिल, तसेच लाईट, सेफ्टी डोअर, पीओपी, पडदे, कार्पेट, रंगकाम आदी इतर कामांचे ₹४,९८,०००/- इतके बिल प्रलंबित होते. सदर रक्कम मंजूर करून मिळण्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू होती.

फिर्यादीनुसार, आरोपीने प्रलंबित बिले तसेच संबंधित ठेव रक्कम बँकेच्या वरिष्ठ स्तरावर मंजूर करून देण्यासाठी तक्रारदाराकडे प्रथम ₹५,००,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदाराने त्याबाबत असमर्थता दर्शविल्यानंतरही आरोपीने लाचेची मागणी कायम ठेवत संबंधित काम लाच दिल्याशिवाय होणार नसल्याचे सांगितल्याचा आरोप आहे.

तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दिली. त्यानंतर तक्रारीची कायदेशीर पडताळणी स्वतंत्र पंच साक्षीदारांच्या उपस्थितीत करण्यात आली. पडताळणीदरम्यान आरोपीने प्रलंबित बिले व ठेव रक्कम मंजूर करून देण्यासाठी एकूण ₹६,००,०००/- लाचेची मागणी केली असून तडजोडीअंती ₹४,००,०००/- स्वीकारण्याचे मान्य केल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले.

त्यानुसार दिनांक २३ जुलै २०२६ रोजी बारामती येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा कारवाई केली. आरोपीने तक्रारदारास बारामती येथे भेटण्यास बोलावून प्रलंबित बिलांच्या संदर्भात चर्चा केली. त्यानंतर बारामती एस.टी. बसस्थानकासमोरील बारामती–इंदापूर मार्गावरील परिसरात आरोपीने आपल्या ताब्यातील इर्टिगा मोटार कार क्रमांक एमएच ४२ बीई ५७८७ मध्ये पंच साक्षीदाराच्या उपस्थितीत तडजोडीनुसार ₹४,००,०००/- लाचेची रक्कम स्वीकारली. लाचेची रक्कम स्वीकारताच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आरोपीस रंगेहात ताब्यात घेतले.

> "लाच देऊ नका... लाच मागितल्यास निर्भयपणे तक्रार करा. भ्रष्टाचारमुक्त समाजासाठी आपले सहकार्य हीच सर्वात मोठी ताकद आहे."
>
> **- प्रभारी पोलीस निरीक्षक बारामती शहर पोलीस स्टेशन**

सदर कारवाईदरम्यान ₹४,००,०००/- लाचेची रक्कम, गुन्ह्याशी संबंधित इलेक्ट्रॉनिक पुरावे, आरोपीचा मोबाईल फोन, गुन्ह्याच्या वेळी वापरण्यात आलेले वाहन तसेच इतर संबंधित मुद्देमाल कायदेशीर प्रक्रियेनुसार जप्त करण्यात आला आहे.

यानंतर आरोपीविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. २८८/२०२६ अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ (सुधारित) चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. सुहास हट्टेकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे हे करीत आहेत.

तपासाच्या हिताच्या दृष्टीने सापळा कारवाईची कार्यपद्धती, ध्वनिमुद्रित संभाषणे, पंचनाम्यांतील तपशील, साक्षीदारांचे जबाब, इलेक्ट्रॉनिक पुरावे, वैज्ञानिक तपासणी, तपासाची दिशा तसेच इतर संवेदनशील माहिती जाहीर करण्यात आलेली नाही.

### नागरिकांना आवाहन

कोणताही शासकीय, निमशासकीय, सहकारी संस्था, बँक, महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा सार्वजनिक कार्यालयातील अधिकारी किंवा कर्मचारी आपल्या कायदेशीर कामासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे लाच, भेटवस्तू किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा मोबदला मागत असल्यास अशा मागणीस बळी पडू नये. अशा वेळी नागरिकांनी लाच देण्याऐवजी त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. मागणीची तारीख, वेळ, ठिकाण व संबंधित व्यक्तीची माहिती शक्य असल्यास सुरक्षित ठेवावी. तक्रारदाराची ओळख कायद्यानुसार गोपनीय ठेवण्यात येते व प्रत्येक तक्रारीची कायदेशीर पडताळणी करून आवश्यक कारवाई केली जाते. भ्रष्टाचाराविरुद्धची लढाई ही केवळ शासकीय यंत्रणेची नसून समाजातील प्रत्येक जबाबदार नागरिकाची आहे. आपल्या एका धाडसी निर्णयामुळे भ्रष्टाचाराला आळा बसू शकतो आणि सार्वजनिक प्रशासन अधिक पारदर्शक व लोकाभिमुख होऊ शकते.

# स्वच्छतेतून लोकसेवेचा संदेश

### कृषि उद्योग मूल शिक्षण संस्थेचा स्तुत्य उपक्रम

बारामती (दै. संध्या)

आदरणीय अजितदादा पवार साहेब यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांना केवळ शब्दांनी नव्हे, तर कृतीतून अभिवादन करण्याच्या उद्देशाने कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था, काऱ्हाटी यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती परिसरात भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले. संस्थेच्या विविध विभागांतील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

मागील वर्षी आदरणीय अजितदादा पवार यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्त, त्यांचा वाढदिवस केवळ वर्षातून एकदाच साजरा न करता प्रत्येक महिन्याच्या २२ तारखेला समाजोपयोगी उपक्रमातून साजरा करण्याचा संकल्प संस्थेने केला होता. त्यानुसार दादांनी उभारलेल्या विविध विकासकामांपैकी दर महिन्याला एका ठिकाणी स्वच्छता करून समाजात स्वच्छतेचा संदेश देण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमाची सुरुवात २२ जुलै २०२५ रोजी सुपा ग्रामीण रुग्णालय, सुपा येथून झाली होती. डिसेंबर २०२५ अखेर बारामती तालुक्यातील विविध ४२ ठिकाणी स्वच्छता अभियान यशस्वीरीत्या राबविण्यात आले. या उपक्रमाचे कौतुक स्वतः आदरणीय अजितदादा पवार यांनी डिसेंबर महिन्यात केले होते. मात्र २८ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या दुःखद निधनानंतर, यंदाची २२ जुलै ही तारीख जड अंतःकरणाने त्यांच्या जयंतीच्या रूपाने साजरी करण्याची वेळ आली.



दादांनी आयुष्यभर जोपासलेली लोकसेवा, शिस्त, वेळेचे नियोजन आणि स्वच्छतेची संस्कृती समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी कल्याणी कॉर्नर ते रसाळ कॉर्नर या परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम राबविली. दादा रोज सकाळी ६ वाजता कामाची सुरुवात करत असत, त्याच कार्यशैलीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सर्व सहभागी सकाळी ६ वाजताच अभियानासाठी उपस्थित झाले. परिसरातील प्लास्टिक, कचरा व इतर टाकाऊ वस्तू गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

या उपक्रमातून स्वच्छता हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून सामाजिक जबाबदारी असल्याचा संदेश देण्यात आला. दादांच्या कार्याचा वारसा जपत समाजहितासाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

हा उपक्रम महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा कृषि उद्योग मूल शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा आदरणीय सुनेत्रा वहिनीसाहेब पवार, राज्यसभा खासदार व संस्थेचे विश्वस्त श्री. पार्थदादा पवार, संस्थेचे उपाध्यक्ष आदरणीय दशरथदादा धुमाळ, सचिव प्रफुल्ल तावरे, खजिनदार सुभाष सोमाणी तसेच सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

याबाबत माहिती देताना संस्थेचे कार्यकारी अधिकारी श्री. विकास निर्मळ म्हणाले, "दादा आज आपल्यात नसले तरी त्यांचे विचार आणि कार्यपद्धती आजही आमच्यासाठी प्रेरणादायी आहेत. स्वच्छतेतून समाजसेवा आणि समाजसेवेतून राष्ट्रसेवा हा त्यांचा संदेश कृतीतून जिवंत ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे. ही मोहीम त्यांच्या पवित्र स्मृतींना वाहिलेली कृतीशील आदरांजली आहे."

## बारामती तालुक्यात विशेष सखोल मतदार पुनरीक्षण (SIR) मोहिमेअंतर्गत १०० टक्के डिजिटल मॅपिंग पूर्ण

बारामती (दै. संध्या)




विशेष सखोल मतदार पुनरीक्षण (Special Intensive Revision-SIR) मोहिमेअंतर्गत मतदार पडताळणी व डिजिटल मॅपिंगचे काम बारामती तालुक्यातील आठ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांनी मुदतीपूर्वीच शंभर टक्के पूर्ण केले आहे. वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही उल्लेखनीय कामगिरी साध्य करण्यात आली. मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डूडी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती मीनल कळसकर, प्रांताधिकारी उत्तम दिघे आणि तहसीलदार स्वप्निल रावडे यांनी सातत्याने आढावा घेऊन आवश्यक मार्गदर्शन केले. तांत्रिक बाबींवरील तत्पर सहाय्य, नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि वेळोवेळी दिलेल्या सूचनांमुळे संबंधित बीएलओंना उद्दिष्ट मुदतीपूर्वी पूर्ण करणे शक्य झाले. या मोहिमेत रणजित दिलीप ननवरे (यादी भाग क्र. ३), पोपट गुलाबराव कोकरे (भाग क्र. ३५), विलास महादेव देवकाते (भाग क्र. १०२), विशाल धुळे (भाग क्र. २४६), गणेश अरुण गायकवाड (भाग क्र. २५३), पुष्पा मधुकर वाबळे (भाग क्र. ३४९), सुनिल रघुनाथ घाडगे (भाग क्र. ३६६) आणि सोमनाथ नारायण वाघमोडे (भाग क्र. ३७२) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील मतदारांची पडताळणी, माहिती संकलन, ऑनलाइन नोंदणी व डिजिटल मॅपिंगचे काम शंभर टक्के पूर्ण केले.

नियमित शासकीय जबाबदाऱ्यांसह विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेतील कर्तव्य पार पाडताना संबंधित बीएलओंनी दुर्गम भागांतील मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन माहिती संकलित केली. ऑनलाइन अर्जांची पूर्तता, माहितीची पडताळणी व वेळेत डिजिटल मॅपिंग करण्यासाठी त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने कार्य केले. स्थानिक नागरिकांचे सहकार्य आणि प्रशासनाच्या समन्वयामुळे हे उद्दिष्ट यशस्वीरीत्या पूर्ण झाले.

या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत तहसीलदार स्वप्निल रावडे यांच्या हस्ते संबंधित बीएलओंना प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. राष्ट्रीय कर्तव्याप्रती दाखविलेली निष्ठा, समर्पित सेवा व उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. या यशामुळे विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीस बळकटी मिळाली असून इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला.